पुणे, किशोर– वर्ष ५४, अंक ३ रा, मार्च २०२५, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 54, Issue- 3, March 2025 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

मार्च २०२५



# पोरी तुला शाळेत जायचं

■ दिपाली कुचेकर

आई माझी म्हणायची, पोरी तुला शाळेत जायचं।
शिकून सवरून सार काही, लय मोठं व्हायचं ।।

काळ्या-काळ्या पाटीवर, गिरवायची अक्षरमोती ।
उज्ज्वल तुझ्या भाग्याची रेषा, आहे तुझ्याच हाती ।।

आम्हां अडाण्यांच्या माथी, सदा भाकरीची चिंता ।
शिकून सवरून सारं काही, सोडव तू हा गुंता ।।

तू नाही भोगायची, आमच्या सारखी आबाळ ।
ज्ञानाच्या गंगेत पोहून तूच बदलावा काळ ।।

नाही व्हायचं भार तू कधी कुणावर ।
जिद्दीनं उभं राहायचं स्वतःच्या पायावर ।।


ज्यांनी गिरवले धडे, त्यांचे बदलले दिस ।
आम्ही फिरवले तोंड, आमच्या तोंडी अर्धा घास ।।

संस्काराचे बीज घेऊन धावत्याला रस्ता सापडे ।
अज्ञानाचा अंधार मिटवण्या, घे ज्ञान प्रकाशाचे धडे ।।

मिळेल लेखणीने दिशा उद्धरण्या दोन्ही कुळा ।
माझ सपान पूर्ण कराया, पोरी शिक तू शाळा ।।

शिक्षणाने मिळे बळ, झेप आभाळी घेण्याचं ।
नाव जगात गाजवाया, पोरी तुला शाळेत जायचं ।।

संपर्क : ८३९०४२९७१९



**किशोर** मार्च २०२५, वर्ष ५४ वे, अंक ३ रा, फाल्गुन- चैत्र शके १९४६

- संपादक : कृष्णकुमार पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
- प्रकाशक : सचिन मेहता, प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर
- अक्षरजुळणी : किशोर विभाग
- कार्यकारी संपादक : किरण केंद्रे
- वितरण व्यवस्थापक जी. आर. पानसरे
- मुखपृष्ठ : राहुल म्हेत्रे संपर्क : ९९६७००७६०४
- *चित्रांकन : घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, लोकेश कुलकर्णी, अमृता ढगे, विनोद गायकवाड, अक्षय वडके, माईंडइट संवाद, जैत्र डिजिटल*


## अंतरंग


- पोरी तुला शाळेत जायचं. ... *दिपाली कुचेकर* ... ०२
- निळ्या समुद्राची गोष्ट ... *मेघश्री दळवी* ... ०६
- गुढीपाडवा. ... *दिलीप धायगुडे* ... ०९
- माझ्या सुपरहिरो! ... *मृणालिनी वनारसे* ... १०
- निवतीचा किल्ला, 'गोल्डन रॉक्स व मोती' ... *सुहास बारटक्के* ... १२
- वसंतोत्सव ... *तानाजी धरणे* ... १५
- रंगांची गोष्ट ... *वंदना भागवत* ... १६
- चला चित्र रंगवूया...!!! ... *रेश्मा बर्वे* ... १९
- AI आणि शेती ... *अच्युत गोडबोले* ... २०
- हुतात्मा नारायण वारके ... *डॉ. मारुती गुरव* ... २२
- नववर्षाचे स्वागतगीत ... *डॉ. मंदार परांजपे* ... २५
- अक्षरांची मैत्री ... *डॉ. नीलिमा गुंडी* ... २६
- डास आणि डासी ... *राहुल हांडे* ... २८
- फुलून ये ... *संतोष दौंडे* ... ३१
- चैत्रांगण ... *डॉ. शिवानी लिमये* ... ३२
- चिमणी ... *माधव गव्हाणे* ... ३४
- हुशार हिरव्या ... *आराधना कुलकर्णी* ... ३६
- कुतूहल. ... *वसुंधरा भोपळे* ... ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ... ४०
- उमलती प्रतिभा ... ४२
- चित्रकथा : जादूगाराची सुटका ... *घनश्याम देशमुख* ... ४४
- स्मार्ट घर चिऊचं ... *लक्ष्मीकांत माने* ... ४६

**ENGLISH SECTION**

- Song of Joy ... *Meena Khond* ... ४७
- Bandu Learns to fly ... *Vivek Bhalerao* ... ४८
- Funny Puzzle ... *Ghanshyam Deshmukh* ... ५०



ऑनलाईन वर्गणीक(रता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील (डमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, **संपादकीय** : ०२०- २५७१६१०७, **वितरण व तक्रार** : ०२०-२५७१६२४४,
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in




'किशोर' फेब्रुवारी २०२५ अंकाचे प्रकाशन पुणे येथे भरलेल्या तिसऱ्या विश्व मराठी संमेलनात करण्यात आले. यावेळी (डावीकडून) श्री. सदानंद मोरे (अध्यक्ष, साहित्य संस्कृती मंडळ), डॉ. ज्ञानेश्वर मुळे (माजी परराष्ट्र सचिव व अध्यक्ष, अभिजात भाषा पाठपुरावा समिती), श्री. कृष्णकुमार पाटील (संचालक, बालभारती), पद्मश्री मधु मंगेश कर्णिक (ज्येष्ठ साहित्यिक), श्री. किरण केंद्रे (कार्यकारी संपादक, किशोर), श्री. लक्ष्मीकांत देशमुख (अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती), श्री रवींद्र शोभणे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ), श्री. विनोद अस्मर (भांडार व्यवस्थापक, पुणे भांडार) आदी मान्यवर उपस्थित होते.

नमस्कार,

'किशोर'चे १३२ अंक आमच्या शाळेत नियमित येतात. मुलांना 'किशोर' मासिक वाचनाची खूप चांगली आवड लागली आहे. मुलं खूप आवडीने 'किशोर' वाचतात. हा अंक येण्याची वाट पाहत असतात. अंक हातात पडताच पूर्ण वाचून काढतात, त्यातील कोडी सोडवतात, चित्र रंगवतात.

मुलांना चित्रकोडी सोडवायला खूप आवडतात. अंकातील गोष्टी वाचून ते इतरांना सांगतात, कवितांना चाली लावतात. परिपाठात या गोष्टींचे, कवितांचे सादरीकरण करतात. 'भावी आधारस्तंभ' व 'उमलती प्रतिभा' या सदरामुळे मुलांना त्यांच्या भावविश्वातल्या आपल्या सारख्याच आपल्या वयाच्या लिहिलेल्या मुलांच्या गोष्टी वाचायला व चित्रे पाहायला मिळतात. ही सदरे मुले खूप आवडीने वाचतात व त्यावर चर्चा करतात. 'किशोर' अंक रंगीत असून त्याची मांडणी आकर्षक असल्यामुळे मुलांना वाचनाची प्रेरणा मिळत आहे.

**निता दादाराव चव्हाण**

सोनदरा गुरुकुल माध्यमिक विद्यालय डोमरी, ता. पाटोदा, जि. बीड– ४१४२०४.



हितगुज

# बालकांचा हक्क

किशोर मित्र-मैत्रिणींनो,

५ मार्च २००७ हा दिवस तुम्हां सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. कारण याच दिवशी 'राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगा'ची स्थापना करण्यात आली. जसे मोठ्या व्यक्तींना हक्क असतात, तसेच तुम्हां लहान मुलांचेदेखील हक्क आहेत. या हक्कांची जपणूक राज्य आणि केंद्र सरकार, तसेच मुलांच्या जन्मदात्या पालकांनी करणे तसेच त्यांचे बालपण अतिशय मोलाचे, महत्त्वाचे मानण्यात आले आहे. आपल्या राज्यघटनेतील तरतुदीनुसार मुलांच्या महत्त्वाच्या गरजा उदा. अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, मनोरंजन इत्यादींसह कोणत्याही आजारांपासून सुरक्षितता मिळणे आदी मुलांचे महत्त्वाचे हक्क पूर्ण होणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे असे मांडण्यात आले आहे. याकरिता भारतात केंद्र सरकारच्या अखत्यारित 'बाल अधिकार संरक्षण आयोग (एन.सी.पी.सी.आर.)' आणि आपल्या राज्यात 'महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग' अशा दोन मंडळांची स्थापना २००७ मध्ये करण्यात आली. केंद्र आणि राज्य आयोगांच्या माध्यमातून बाल हक्क संरक्षण कायदा २००५ (२००६ मधील ४) निर्माण करून राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे याकरिता काम केले जाते. याबाबत फ्रान्स देशामध्ये मुलांच्या प्रगतीसाठी व विकासासाठी त्यांना विशेष बालहक्क दिले पाहीजे, हा विचार पुढे आला आणि संपूर्ण जगाने तो स्वीकारला.यातूनच बालमजुरी सारख्या समस्येवर कायदा करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय बालवर्ष' म्हणून घोषित केले. यामुळे बालकांसंदर्भातील महत्त्वाच्या व सकारात्मक बदलांना योग्य प्रोत्साहन मिळाले. पुढे २० नोव्हेंबर १९८९ मध्ये बालहक्कांवरील परिषदेने मुलांचे सर्व हक्क एकमताने मान्य केले.



किशोर मित्रमैत्रिणींनो, बालकल्याण विषयानुसार लहान मुलांच्या हक्कांना 'बालहक्क' किंवा 'बाल अधिकार' असे म्हटले जाते. साधारणतः ० ते १८ वर्षांखालील सर्वांना 'बालक' असे म्हटले जाते. आजच्या धावपळीच्या, वेगाने बदलणाऱ्या जगात बालकांना त्रास दिल्याच्या, त्यांच्या शोषण, पिळवणुकीच्या गोष्टी, बालविवाह, तस्करी आदींच्या घटना, बातम्या तुम्ही ऐकल्या असतील. युद्धात आणि विविध घटनांमध्ये बालकांवर अन्याय, भेदभाव झाल्याबाबत घरातील मोठी माणसे चर्चा करताना तुम्ही पाहिले असेल. लहान मुले, बालके गुन्हेगारांच्या हाताशी लागून त्यांचा कोणत्याही प्रकारे छळ, इजा,गैरवर्तन, दुर्लक्ष होऊ नये, ती गुलाम,असुरक्षित होऊ नयेत याकरिता बालहक्क किंवा बाल अधिकार निर्माण करण्यात आले. १८ वय वर्षांपेक्षा मोठ्या व्यक्तीकडून बालकांचे अपहरण, शोषण करणे किंवा मुलांना ईजा पोहोचेल असे भावनिक, मानसिक किंवा शारीरिक हानी होईल असे वर्तन घडल्यास त्याला गुन्हा मानला जातो आणि कायद्यानुसार त्या व्यक्तीला शिक्षा केली जाते. तुम्ही संकटात सापडला किंवा कोणी तुम्हांला त्रास दिला तर चाइल्डलाइनच्या १०९८ या क्रमांकाद्वारे मोफत मदत केली जाते. मदतीसाठी तुम्ही हा फोन नंबर नेहमी लक्षात ठेवा.

तुम्हां बालकांचे हक्क जपले जावेत, तुम्हांला आयुष्याचा संपूर्ण आनंद घेत जगण्याचा हक्क मिळावा यासाठी आपल्या देशात तसेच जगभरात अनेक सुधारक आणि संस्था मनःपूर्वक काम करत आहेत. तुम्हांला सुखी समृद्धी जीवन जगता यावे, यासाठी ते अहोरात्र मेहनत घेतात. तुम्ही या सर्व मान्यवरांनी बालहक्कासंदर्भात केलेल्या कामाची तसेच बालहक्क संरक्षण कायद्याची अधिक माहिती मिळवा. याविषयी आपले मित्र, शिक्षक, पालक यांच्याशी नक्की चर्चा करा.

**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक



मेघश्री दळवी

# निळ्या समुद्राची गोष्ट

‘‘आठ, नऊ, आणि दहा.’’ जस्मीन दीदीने मोजणी पूर्ण केली आणि मुलं दबकत दबकत लिफ्टमध्ये शिरली. एरव्ही या ठिकाणी फक्त मोठी माणसं जातात असं ऐकलं होतं त्यांनी.

चार बाजूंनी चकाकत्या भिंती आणि लिफ्ट वर जाताना येणाऱ्या एक वेगळ्याच आवाजाने मुलं किंचित घाबरली. त्यांच्या वस्तीत तर सगळी बैठी घरं होती. शाळा, खेळघरं, दुकानं, हेही बैठं. मग वरखाली जायचा



प्रश्न येतोच कुठे? नाही म्हणायला घराबाहेरच्या जिन्याने गच्चीवर जाता यायचं. तिथल्या बागेला पाणी घालायला, नाहीतर भाज्या खुडायला. या लिफ्टने जाताना म्हणूनच मुलं थक्क होऊन गेली होती.

''आपल्या सफरीचं सांगितलं ना, तेव्हा आजोबा म्हणाले की ते खूप आधी ते लहान असताना समुद्राच्या आत जायचे, त्यात डुंबायचे, खेळायचे.'' अरूप जग्गूच्या कानाशी पुटपुटला.

''चल, असं कधी असतं का?'' जग्गू कुरकुरला.

''अरे आधी. आता नाही काही.''

''मला तर दोन दिवस स्वप्नात समुद्र येत होता. निळा निळा आणि त्यात उड्या मारणारे डॉल्फिन मासे.'' तिकडे मिनू सुमाला म्हणाली.

''आपल्याला बघूया काय दिसतं ते, मिनू.'' सूझनसुद्‌धा खूष होती.

लिफ्ट थांबली तेव्हा बाहेर पडून त्यांनी पाहिलं तर एक उंचच उंच भिंत असलेला मोठा बोगदा होता.

''सावकाश माझ्या मागून या.'' दीदीच्या सूचनेनुसार चालताना कुणास ठाऊक का, सगळ्यांची बडबड थांबली होती. कितीतरी वेळ चालल्यानंतर दूरवर दिसलं की एका बाजूची दगडी भिंत काचेची होऊन गेलेली होती. त्यातून प्रखर प्रकाश आत येत होता. त्या काचेपलीकडे काय दिसेल त्याची हुरहुर सगळ्यांना लागली.

आणखी चालल्यावर मग अलगद समोर ते दृश्य आलं. लहानमोठे काळपट दगड आणि ओलसर पिवळट वाळू. आणि मग त्यापलीकडे समुद्र. या टोकाकडून त्या टोकाकडे नजर जाणार नाही इतका अफाट पसरलेला समुद्र. त्यात किनाऱ्यापाशी येऊन फुटणाऱ्या लाटा होत्या, त्यावर सूर्यकिरणांनी रेखाटलेली नक्षी होती. सोन्यासारखी झळाळी होती. आणि तरीही काही वेगळं होतं. आजवर चित्रात नाहीतर व्हिडिओत बघितलेल्या समुद्रापेक्षा हा काहीतरी वेगळा दिसत होता.

''दीदी, समुद्राचा रंग निळा असतो ना?'' मिनूने दबकत विचारलं.

''हो. एके काळी होता निळा. आता मात्र समोर दिसतो तसा मळकट करड्या रंगांचा असतो समुद्र. कारण आपण त्यात प्रचंड कचरा टाकून ठेवला आहे. प्लॅस्टिक, कसकसली रसायनं, आणि आपणच फेकून दिलेल्या सगळ्या वस्तू.''

मुलं दचकली. दर वर्षी वेगवेगळ्या मुलांना या सफरीला घेऊन येताना जस्मीन दीदीला हाच अनुभव यायचा. पण आधी सांगून मुलांच्या मनाची तयारी करायला तिला नको व्हायचं. स्वत:च्या डोळ्यांनी पाहून त्यांना समजू दे, काय परिस्थिती आहे ती – तिला वाटायचं. आणि तीच नव्हे तर वस्तीतल्या साऱ्यांचाही तोच विश्वास होता.

''दीदी, सगळा समुद्र करडा आहे की फक्त इथलाच?'' मिनूच्या आवाजात भय होतं.

''काही ठिकाणी तर याहून मळकट काळा आहे.'' बोलताना जस्मीन दीदीच्या डोळ्यांसमोर फक्त एकदाच पाहिलेलं ते दृश्य आलं आणि ती शहारली.

मुलं गप्प पाहून ती म्हणाली, ''मला माहीत आहे की तुम्ही आजवर चित्रांमध्ये किंवा व्हिडीओंमध्ये पाहिलेला समुद्र हा नाही. पण हा खराखुरा समुद्र पाहणे तुमच्यासाठी जरुरी आहे. आपण आज जमिनीखाली वस्ती करून राहतो, समुद्राच्या जवळपासही फिरकत नाही. कधीतरी फक्त काचेआडून असं त्याच्याकडे पाहतो, ते का? ते तुम्ही साऱ्यांनी समजून घ्यायला हवं. त्यासाठी आहे आजची ही सफर.''

''आणि मासे, डॉल्फिन?'' सूझनचा आवाज खाली गेला होता.

''मासे नाहीत आता तिथे. आणि डॉल्फिन, शार्क, असे मोठे मासे तर कधीच नष्ट झाले. कसे जगणार इतक्या विषारी पाण्यात?''

''आणि पक्षी, प्राणी?''

''थोडीफार झाडंझुडपं तग धरून आहेत, त्यांच्या आसऱ्याने थोडेसे प्राणीपक्षी आहेत. आपण जवळच व्यवस्थित आच्छादन करून काही प्राण्यांची सोय केली आहे. पण पक्ष्यांना मात्र त्या ठिकाणी फार उडता येत नसल्याने ते जास्त काळ नाही जगत. शिवाय पाण्याची समस्या आहेच. आपल्यासाठी आपण पाणी निर्जंतुक करून घेतो, जपून वापरतो. नाही म्हटलं तरी प्राणीपक्ष्यांना ते पुरवताना मर्यादा येतात.'' जस्मीन दीदीच्या आवाजात खेद होता.

''आपण तो समुद्र पुन्हा स्वच्छ, निर्जंतुक करू शकतो?'' मिनूने धीटपणे विचारलं.

''केले आपण प्रयत्न, नाही असं नाही. फक्त आम्ही मोठ्या माणसांनी नाही तर तुमच्यासारख्या लहान मुलांनीदेखील खूप प्रयत्न केले. गाळ उपसून काढला. प्लॅस्टिक वेचून काढलं. जागोजागी सांडपाणी सोडायला रोखलं. नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रयोग केले. पण हा महासागर किती मोठा, आणि त्यापुढे आपण माणसं किती छोटी. आपले प्रयत्न अपुरे पडले.''

मिनूने मान हलवली, मात्र तिची नजर त्या विस्तीर्ण सागरावरून हटत नव्हती. प्रदूषण आणि कचरा असला तरीही त्यात तिला एक खास काहीतरी वाटत होतं. पृथ्वीवर एके काळी या समुद्राने सत्तर टक्क्यांहून अधिक भाग व्यापला होता. आज म्हणे तो आणखी वाढला आहे. विस्तीर्ण आणि सखोल. पाणीच पाणी. वाढत्या तापमानाला तोंड देताना त्याचा आकार मोठा झाला, अनेक हिमनद्या आणि हिमनग त्यात सामावून गेले, अनेक गावं आणि बेटं त्याने जिंकून घेतली. किती काय काय ऐकलं होतं, वाचलं होतं.

प्रत्यक्ष पाहताना सागराचं हे अवाढव्य रूप पाहून इतकं थरारक वाटतं आहे, तिच्या मनात आलं. पण त्याला गालबोट आहे.

''मग समुद्राचं हे सत्य आमच्या पुस्तकात का सांगत नाही?'' अरूपने तोंड उघडलं. ''चित्र आणि व्हिडिओमध्ये समुद्र निळाशार गोड असा का दाखवतात? तिथेच सांगून टाकलं की हा काळपट रंगाचा प्रदूषित समुद्र, तर आमचा भ्रमनिरास तरी होणार नाही.''

''काय आहे ना अरूप, तुम्ही लहान वयात मान्य केलं की समुद्र असाच घाणेरडा असणार, की पुढे काही नाही व्हायचं. तसाच राहील तो. पण आम्हांला तसं नको आहे. समुद्राची ही मळकट करडी अवस्था तात्पुरती आहे. समुद्र कधी ना कधी मूळ रूपात येईल ही आम्हांला आशा आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आता आपण समुद्रात प्रदूषण करणाऱ्या गोष्टी सोडत नाही. आहे ते प्रदूषण कमी करणे याकडे लक्ष देतो. हळूहळू सुधारणा होते आहे. पण समुद्र होता तसा होईल ते पाहायला कदाचित ते पाहायला आमची पिढी नसेल. आमचे प्रयत्न तुम्ही पुढे न्याल. समुद्र पुन्हा एकदा निळाशार होईल अशी आमची आशा आहे.'' जस्मीन दीदीचा आवाज भरून आला होता.

''दीदी, जमिनीवरचं तापमान सहनशक्तीच्या पलीकडे जायला लागलं तेव्हा आपण जमिनीखालची वस्ती उभारायला घेतली. पण त्या वेळी आधीच भविष्याचा विचार केला नाही का? काही उपाय केले असतील ना?'' ''विचार केला नाही असं नाही, उपायही केले. पण ते कमी पडले. येणाऱ्या संकटाची नीटशी कल्पना त्या वेळच्या लोकांना नाही आली. उपाय झाले, अजूनही होत आहेत. पण त्याला वेळ लागणार. तरीही आज न उद्या समुद्र पुन्हा स्वच्छ निळा होईल याची आम्हां सर्वांना खात्री वाटते.'' दीदी आशेने बोलत होती.

बोगद्यातून परत जाताना मिनूला अजूनही त्या सागराची ओढ लागली होती. तिला तो जवळून पाहायचा होता. काचेच्या पलीकडे जाऊन. अंगावर ऊन आणि वारा घेत.

मिनू गप्प गप्प पाहून सुमा म्हणली, ''काय विचार करतेस?''

''आपल्याला समुद्राला जसा होता तसा पुन्हा करून ठेवायचा आहे, याचा.''

''होईल ते शक्य?''

''का नाही? आपण माणसांना जर तो खराब करता येतो. तर तो स्वच्छही करता येईल ना?''

''हे बरोबर आहे.'' जग्गू मागून बोलला. ''अरूपचे आजोबा म्हणे समुद्रात पोहायचे. तसं पुन्हा व्हायलाच हवं.''

''आणि तिथे मासेसुद्धा पुन्हा यायला हवेत.'' मिनू म्हणाली. ''आपल्याला जमिनीवर राहता येत नाही म्हणून आपण जमिनीखाली रहायला गेलो. पण ते बिचारे डॉल्फिन कुठे गेले असतील? त्यांचं घर आपण का खराब करून टाकलं? असं मुळीच चालायचं नाही. आपण त्या सर्वांना त्यांचं घर परत दिलंच पाहिजे. समुद्र पुन्हा स्वच्छ आणि निळाशार करायलाच हवा!''

जस्मीन दीदी शांतपणे ऐकत होती. तिच्या चेहऱ्यावर समाधानाचं एक हलकं हसू उमललं होतं.

**संपर्क : ९८२०१४४६५७**

# गुढी पाडवा



■ दिलीप धायगुडे

चैत्र मासाच्या आगमनाने
आला गुढीपाडवा सजून
उभारुनी गुढी विजयाची
टाकू स्वार्थ, अहंकार पुसून

गोड नैवेद्य, फुले वाहून
सडा रांगोळी दारात
ठेवूनी मान वैकल्याचा
जपावा प्रेमभाव उरात

सूर्यकिरणांच्या स्वागतास
नवीन वस्त्रे घालून
देवादिकांस स्मरून पूजन
साडेतीन मुहूर्ताचा मान

करू संकल्प आपण सारे
विश्वासाने जगण्याचा
देऊ एकमेकांस आधार
ठेवू मान गुढीपाडव्याचा

संपर्क : ७७३८०३९१९५



मृणालिनी वनारसे



# माझ्या सुपरहिरो!

दोस्तांनो,

आपल्या आजूबाजूला सुपरहिरो असतात आणि आपल्याला ते कधी कधी दिसत नाहीत असं म्हटलं तर तुमचा विश्वास बसेल का? सुपरहिरोने नेहमी आकाशातून अवतरावं, शत्रूला लोळवावं, जगाला वाचवावं असं थोडंच आहे! सुपरहिरो अतिशय शांतपणे काम करत असतात, अगदी तुमच्या नाकासमोर आणि तुम्हांला दिसत नाहीत.. किंवा त्याला थोडा वेळ द्यावा लागतो. माझं असंच झालं. पर्यावरण विषयात काम करत असताना मला सुपरहिरो भेटले ते अगदी माझ्या आसपास. खरं म्हणजे भेटल्या म्हणावे लागेल. कारण हे लिहिताना माझ्या डोळ्यांसमोर असंख्य महिला आहेत ज्यांनी सुपरहिरो म्हणून काम करून स्वतःला, आपल्या घराला मोठ्या निगुतीने सांभाळलं आहे. अंगणापलीकडच्या आसमंताशी देखील जोडून घेतलं आहे. जगाला वाचवण्याबद्दल त्या कदाचित काही म्हणणार नाहीत, पण त्यांच्या छोट्यामोठ्या कृतींमधून त्यांनी किती काय जोपासलं आहे याची मोजदाद त्या ठेवत नाहीत, कुणी ठेवू शकणार नाही.

माझ्या काकूची गोष्ट सांगते. घरात सांभाळून चीज-वस्तू आणाव्या. भसाभस खरेदी करू नये हा तर तिचा शिरस्ता होताच पण खरेदी-विक्री पलीकडे निसर्गात काय रुजतं कसं उगवतं, त्याचं आपण काय करू शकतो हे बघण्याकडे तिचा मोठा कल होता. अजूनही आहे. अगदी अलीकडची कोविड काळातली गोष्ट. त्या वेळी काकू नाशिकजवळच्या एका छोट्या गावी राहात होती. तिथे मुलांचं एक वसतीगृह होतं. कडक लॉक डाऊनच्या काळात व्यवहार थंडावले तशी काही काळ रोजचा भाजीपाला मिळणं अवघड झालं. वसतीगृहात वस्तू अगदी निगुतीने वापराव्या लागत, तिथे

तिने मुलांना फळभाज्यांचा, पालेभाज्यांचा अगदी प्रत्येक भाग कसा वापरता येईल हे शिकवलं, स्वतः करून खाऊ घातलं. दोडक्याच्या शिरांपासून भोपळ्याच्या सालींपर्यंत प्रत्येक भाग वापरायचा याची एक वेगळीच गंमत तयार झाली. मुलेही वाट बघू लागली की आज नवीन काय तयार होणार? एकदा तर तिने डोंगर उतारावर फुललेली ग्लिरिसिडियाची फुलं पाहिली आणि मुलांना म्हटलं जरा आणा बघू ती फुलं, तिनं फुलं गरम पाण्यात घातली आणि नंतर त्याची चक्क भाजी करून पाहिली, छान झाली. नवा प्रयोग झाला. मुलांना मजा आली. पोटं भरली. ती स्वतः कोकणातली असल्याने तिला रानभाज्यांची आधीपासूनच माहिती. त्यात काही 'डूज आणि डोंट्स', म्हणजे काय करावे आणि काय करू नये हे देखील नीट माहीत. या पारंपरिक ज्ञानावर आधारित तिने नवे प्रयोग करून पाहिले. प्रयोगादाखल आधी वाटीभर करून बघावे असा तिचा शिरस्ता. अर्थात रानाची पुरेशी ओळख असणे हे अशा प्रयोगांचं गृहीतक बरं का! आपले आपण काहीबाही करण्याआधी रानाची नीट ओळख तर करून घ्यायला हवी.

तर मुद्दा काय की, सगळ्या गोष्ट विकत आणाव्या लागत नाहीत. भारतासारख्या देशात राहून जैवविविधतेची माहिती नसणे म्हणजे नदीशेजारी राहून तहानेले राहण्याप्रमाणे आहे. पावसाळ्यात अगदी शहरात सुद्धा रस्त्याकाठी, मोकळ्या प्लॉटमध्ये अनेक वनस्पती, भाज्या फुलतात. ज्यांच्याकडे ती नजर आहे ते बरोबर त्याकडे बघतील. मी तर अशा केनाकुर्डूसारख्या भाज्या मुद्दाम अंगणात वाढू देते. थोडे रान मोकळे मिळाले की त्या आपले काम करू लागतात. कोण म्हणते कष्टाविण फळ नाही?

माझी मराठवाड्यातील आजी चिंचांच्या साली कुटून त्याची पूड करून ठेवायची. भांडी कशाने स्वच्छ करायची? या पावडरीनेच की. चिंचांचा गर खाण्यात आणि पूड भांडी घासण्यात. काही विकत आणायला नको आणि कचरा करायला नको.

पुण्यासारख्या मोठ्या शहरात सुद्धा परसबागा सांभाळणाऱ्या आज्या, मावश्या, ताया मला भेटत राहतात. कुणी घोसावळ्याचे स्क्रबर करतात तर कुणी नारळाच्या हिराचे उत्कृष्ट झाडू. ही कौशल्ये जपणाऱ्यांना हिरोच म्हटले पाहिजे.

आपण काही झाडांप्रमाणे आपले अन्न बनवू शकत नाही की आपल्या कचऱ्याचे सूक्ष्मजीवांप्रमाणे विघटन करू शकत नाही. आपण झाडांकडून घेणार आणि सूक्ष्मजीवांना देणार. मग त्यांच्या कामाच्या वेगाशी आपला घेण्याचा वेग जुळवता आला की पर्यावरणाचे कामच झाले! या सर्व जणी हेच करत होत्या, तुमच्यापायी आजूबाजूला अशी अनंत उदाहरणे असतील.

याहून पुढे जाऊन याच आयाबाया शेताकडे बघतात, त्या त्या ऋतूतील सगळी कामे करताना, पुढील पेरणीसाठी बीज सांभाळतात. त्याच्या किती युक्त्या, प्रयुक्त्या त्यांना ठाऊक असतात. राहीबाई पोपेरे या अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोंभाळणे या आपल्या गावी शेती तर सांभाळतातच पण पारंपरिक बियाणांच्या वाणांना सांभाळतात, त्यांना वाढवतात. या त्यांच्या कामाबद्दल त्यांना भारत सरकारने २०२० साली पद्मश्री पुरस्काराने गौरवले आहे. राहीबाईंमुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. त्या एकट्या नाहीत. महिला काय करू शकतात आणि त्याचं महत्त्व किती मोठं आहे याची चुणूक आपल्या या उदाहरणातून दिसते.

आपण एक करू शकतो. आपल्या घरापासूनही सुरुवात करू शकतो. जरा बघूया आपल्या आजूबाजूच्या आया, मावश्या, ताया घरात काय काय करतात, घर कसं सांभाळतात. त्यातली एखादी गोष्टसुद्धा आपल्यासाठी खूप प्रेरणादायक ठरू शकते. पुडीचा दोरा गुंडाळून ठेवणे ही गोष्ट आता अगदी इतिहासजमा झाली आहे, कुणी असं करत असेल तर ते हास्यास्पदच ठरू शकतं 'वापरा आणि फेका' संस्कृतीत. पण त्यावर हसण्याआधी मला सांगा, तुम्ही अशी एवढीशी गोष्ट पुढील वापरासाठी ठेवाल की फेकाल? तुम्ही काय निवडाल याने पर्यावरणाला किती फरक पडेल ही पुढची गोष्ट. पण या निवडण्यातून आपण कसे राहणार, कसे जगणार, कशात विरंगुळा शोधणार हे सुद्धा ठरत जातं. तेव्हा निवड सावधपणे करा. आपलं संवर्धनाचं काम सातत्याने, स्थिरतेने, रंजकतेने करत राहणाऱ्या आपल्या आजूबाजूच्या सर्व महिलांना सलाम.

**संपर्क** : ioraespune@gmail.com

सुहास बारटक्के

भाग ३

# निवतीचा किल्ला, गोल्डन रॉक्स व मोती


''नील, चल आज आपण निवतीचा किल्ला पाहायला जाऊया.'' नीलच्या घरी अगदी सकाळीच आलेल्या बाबूलनं म्हटलं आणि पंधरा मिनिटांतच पाण्याच्या बाटल्या, टोप्या, दुर्बीण वगैरे घेऊन ही जोडगोळी टेकडीच्या दिशेनं निघाली. डोंगराचा एक मोठा सुळका थेट समुद्रात घुसला होता. त्यावरच बांधला होता हा निवतीचा किल्ला. निवती आणि भोगवे बीचवर लक्ष ठेवण्यासाठी हा किल्ला बांधण्यात आला होता. किनाऱ्यावरून जवळ भासत असला तरी किल्ल्यावर जायला थेट अडीच तीन किलोमीटरची पायपीट करावी लागायची. गाडीनं जायचं तर पूर्ण टेकडीला वळसा मारूनच घाटरस्त्यानं जावं लागायचं.

नील व बाबूल जवळच्या रस्त्यानं चालत चालत टेकडीवरच्या किल्ल्याकडे निघाले तरीही दोन अडीच किलोमीटरचं अंतर होतंच. त्यामुळे ते दोघेही जेव्हा किल्ल्यावर पोहोचले तेव्हा त्यांना चांगलंच दमायला झालं होतं.

''हा किल्ला म्हणे छत्रपती शिवरायांनीच मालवणचा सिंधुदुर्ग बांधल्यावर उभारला.''

बाबूल सांगू लागला, ''मालवण जरी दहा किलोमीटर अंतरावर असलं तरी हा किल्ला डोंगरी किल्ला असल्यानं निवती, भोगवे, मालवणपर्यंत सर्व समुद्रकिनाऱ्यावर टेहेळणी करू शकत होता. परंतु पुढे त्याची देखभाल नीट झाली नाही व किल्ला ढासळला.''

नीलनं पाहिलं की किल्ला भग्नावस्थेत आहे. तब्बल पाच एकर जागेवर पसरलेला हा किल्ला झाडाझुडपांनी भरून गेला आहे. किल्ल्याच्या भिंती व बुरूज ढासळले आहेत. झाडाझुडपातून त्या किल्ल्याच्या आकाराचा शोध घ्यावा लागत होता.



एके ठिकाणी पडक्या भिंतीवर चढणे सोपे होते त्यावर हे दोघेही चढले. समोरचं दृश्य आश्चर्यचकित करणारे होते. दक्षिणेकडे निवतीचा समुद्रकिनारा, समोर अगदी खालच्या बाजूला भोगवेचा तर अगदी दूरवर दुर्बिणीतून पाहिलं तर मालवणचा सिंधुदुर्ग सागरी किल्लाही नजरेच्या टप्प्यात येत होता. किल्ल्याच्या समुद्राच्या बाजूच्या तटाखाली एका बाजूस निवतीचा चंद्राकृती सुंदर किनारा दिसत होता. पांढरी शुभ्र वाळू आणि निवळशंख निळेशार पाणी, त्यावर हळुवारपणे येणाऱ्या लाटा, असं खूपच सुंदर दृश्य दिसत होतं. तिथून हलावंसंच वाटत नव्हतं. समुद्रात दूरवर हेलकावे घेत असलेल्या छोट्या छोट्या मच्छिमारी बोटी, छोट्या होड्या, होडकी आणि होडीमधील मासे खाण्यासाठी होडीवर चकरा मारणारे समुद्रपक्षी, खूपच सुंदर! नजरेचं पारणं फेडणारं विहंगम दृश्य होतं ते. ते दृश्य डोळ्यांत साठवून नील व बाबूल त्या भिंतीवरून खाली उतरले.

थोडं पुढे चालत गेल्यावर समुद्राच्या बाजूला असलेले बुरुजाच्या भिंतीमधले दोन झरोके त्यांना दिसले. त्या झरोक्यातून शत्रूवर दारुगोळा डागण्यात येत असावा. नीलनं त्या झरोक्यातून डोकावून पाहिलं तर त्याला भितीच वाटली एवढी किल्ल्याची उंची होती. तब्बल तीनशे फुटांहून जास्त. किल्ल्यातील काही खुणेचे दगड पाहत दोघांनी किल्ल्यावर भटकंती केली. एका झुडपाजवळ थोडी विश्रांती घेऊन ते दोघे परत निघाले. आता थोडं खाली उतरून त्यांना सोनेरी खडक-गोल्डन रॉक्स पहायला जायचे होते. निवती किनाऱ्याजवळ हे खडक होते. दोघेही झपाझप निघाले.

''निवतीच्या आसपास ज्या डोंगररांगा समुद्रात घुसल्या आहेत ना, त्या सगळ्या काळ्या खडकांनी भरलेल्या आहेत, फक्त हीच एक डोंगराची कडा, तांबूस, पिवळ्या खडकांची आहे.'' बाबूल सांगू लागला. तेवढ्यात दोघेही त्या डोंगराच्या माथ्यावर पोहोचलेही होते. तिथले एकावर एक रचलेले पिवळ्या रंगाचे खडक अतिशय सुंदर दिसत होते. एके ठिकाणी तर एकावर एक रचलेले खडक एखाद्या नक्षीदार

## वेंगुर्ला रॉक्सचे रहस्य

खांबाप्रमाणं दिसत होते. दुपारच्या उन्हात सगळा परिसर उजळून निघाला होता. अगदी खालच्या बाजूला असलेल्या एका खडकाचा रंग तर चक्क भगवा होता. काळ्या खडकाच्या डोक्यावर जणू लाल टोपी असावी असा तो भासत होता. या सोनेरी खडकांनी निवतीच्या किनाऱ्याचे दोन भाग केले होते. किनाऱ्याला अगदी लागूनच हे खडक असल्याने निवतीचा किनारा इथे दुभागला गेला होता. या खडकांचे सौंदर्य केवळ अवर्णनीय असंच होतं. खडकांच्या मागच्या बाजूने नील व बाबूल खाली उतरले. खडकाला वळसा घालून ते थोडे पुढच्या बाजूला आले. त्यांनी पाहिले की निवतीचे सोनेरी खडक दुपारच्या उन्हात असे झळाळत होते की कुणीतरी समुद्रावर सोन्याचीच उधळण करीत आहे.

''इथे दोन्ही पद्धतीचे खडक आढळतात बेसॉल्ट पण आणि लॅटेराईट पण'' नीलने कंप्युटरवर इंटरनेटच्या सहाय्यानं मिळवलेली माहिती पुरवली. मग दोघे कौतुकाने काळे आणि पिवळे रंगीत दगड वेचू लागले.



खाली एका बाजूला थोडी पुळण होती. तिकडे दोघे उतरले. या छोट्याशा किनाऱ्यावर कुणी येत नसे. कारण भरतीच्या वेळी हा परिसर पाण्याखाली जाई. हे सोनेरी खडक निळ्याशार पाण्याने वेढले जात. आज, आत्ता ओहोटीची वेळ असल्याने त्यांना इथे येता आले. दोघे खाली उतरले आणि दगड गोळा करता करता त्यांना खजिना हाती आला तो शंख आणि शिंपल्यांचा. शंख शिंपल्यांच्या अक्षरशः खच त्या ठिकाणी पडला होता. लांब एखाद्या मनोऱ्याप्रमाणे दिसणारे भगव्या तपकिरी रंगाचे शंख तर खूपच होते. वेगवेगळ्या आकाराचे शंख शिंपले गोळा करता करता नीलला सापडली एक इंच दीड इंच लांबीची कवडी. कवडी हा छोटा शंखच असतो वरून अर्धगोलाकार तर खालून सपाट. वरचा भाग उंच व तपकिरी करड्या रंगाचा तर खालचा भाग पांढरा, आणि नक्षीदार भेग असलेला.

'कवडी थोडी दुर्मीळ असते. क्वचितच सापडते. म्हणूनच पूर्वी तिचा चलन म्हणूनही वापर करायचे. कवडीमोल हा शब्द त्यावरूनच आलाय...'' असं बाबा सांगतात... बाबूल सांगू लागला. 'आणि हो, प्रत्येक शंखाच्या आत किंवा कवडीच्या आत एक प्राणी असतो. त्याचंच हे घर आहे किंवा संरक्षक कवच आहे. काही काळाने ते हे घर सोडून देतात. ते इतर छोटे प्राणी पळवतातही. अगदी रिकामे झालेले शंख शिंपले समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर आणून टाकतात, ते आपण गोळा करतो. समुद्राच्या पोटात असा विस्मयकाकरक खजिना दडलेला असतो. मोती हा त्यापैकीच एक प्रकार. शिंपल्यामधल्या ऑयस्टर नावाच्या प्राण्याला इतर कुठल्याही प्राण्याचा किंवा बाहेरील वस्तूचा हस्तक्षेप नको असतो. तो शिंपल्याच्या आत रहात असतो. शिंपला उघडून खाद्यही मिळवत असतो. परंतु कधी कधी त्याच्या शिंपल्यात बाहेरून एखादी गोष्ट शिरते व त्यावर आतला प्राणी अंगातील स्राव सोडून त्यावर एक प्रकारचं वेस्टन तयार करतो. त्याचाच काही काळानं मोती बनतो. हल्ली कृत्रिम पद्धतीनं मोती बनवत असले तरी खरे मोती हे समुद्रातच तयार होतात.''

''चला खूप झालं आता घरी जाऊया'' नील म्हणाला.

आणि सर्व जण घराच्या दिशेने निघाले.

**संपर्क : ९४२३२९५३२९**

## भावपूर्ण श्रद्धांजली



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ तथा बालभारतीचे नियंत्रक श्री. विवेक उत्तम गोसावी यांचे वयाच्या ५१ व्या वर्षी दुःखद निधन झाले. विद्यार्थीप्रिय 'किशोर' मासिकाचे प्रकाशक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले.

अगदी कमी वयात त्यांनी नियंत्रक म्हणून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या निर्मिती विभागाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. छपाईच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शालेय विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके वेळेत उपलब्ध करून देण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. कोरोनाच्या काळातदेखील विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत पुस्तके पोहचवून त्यांचा अभ्यास सुरू रहावा यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे खूप कौतुक झाले. त्यांनी नियंत्रक व प्रकाशक म्हणून कार्यरत असताना पाठ्यपुस्तक मंडळाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाने बालभारतीचे कधीच न भरून येणारे नुकसान झाले आहे. विवेक उत्तम गोसावी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– बालभारती परिवार**



# वसंतोत्सव

■ तानाजी धरणे

आला वसंत डौलात
कुहू कोकीळ कूजन
बहरली नटली वनसृष्टी
पाखरे करती गुंजन....!

कोवळ्या पानात उठले
कोमल तेजाचे भंडार
मोगरा पळस फुलला
पांढरा केशरी अंगार...!!

असे उन्हाचे चटके
झाड झेलते देहावं
आला 'वसंत ऋतू'
मन फुलात रंगावं....!!!

आली वसंत चाहूल
आला शिमगा, पाडवा
निसर्ग उधळतो रंग
वाढे 'वसंताचा' गोडवा...!!!

संपर्क : ९९७५३७०९१२

वंदना भागवत

# रंगांची गोष्ट

**(निनाद आणि ऊर्मी घरात खेळत आहेत. फोन वाजतो. आई फोन उचलते.)**

**आई–** हं बोल मुकुंद! अरे, काय झालं आईला? बरं. हो हो, निघतेच आहे. पोहोचते मी दवाखान्यात. आलेच. (मुलांकडे वळून) निनाद, ऊर्मी मी जरा दवाखान्यात जाऊन येते. मामाचा फोन होता. आजीला दवाखान्यात न्यायचं आहे. येतेच आहे मी तासाभरात. छान खेळा. अभ्यास करा. भांडू नका. खाऊ ठेवला आहे टेबलावर. भूक लागली तर खाऊन घ्या. आणि हे बघा, इथं रंगकामाचे खडू काढून ठेवलेत तुमचे. दोघांसाठी कागदही आहेत इथंच. कंटाळा आला तर चित्रं काढा मस्त. काय?

**निनाद –** आजीला खूप बरं नाहीये? तिला



आपल्याकडे घेऊन ये ना.

**आई –** नाही रे. थोडंसंच बरं नाहीये. आलेच मी. आणू हं आपण तिला आपल्याकडे.

**(आई जाते. दार लागल्यावर ऊर्मी उठते आणि टेबलावर ठेवलेली रंगीत खडूंची पेटी आणि कागद घेते.)**

**ऊर्मी –** मी आजीचं चित्र काढणार आहे. म्हणजे आजी घरी येईल आपल्या.

**निनाद – (तिच्या हातून रंगाची पेटी काढून घेतो.)** तुला जमणारे का आजीचं चित्र काढायला? मीच मस्त काढीन.

**(ऊर्मी आणि निनादची रंगपेटीवरून भांडणं होतात.)**

**ऊर्मी –** मी आईला नाव सांगणारे तुझं. माझ्याशी भांडतोस म्हणून. मला रंगवू देत नाहीस म्हणून.

**निनाद –** बरं बरं. देतो मी तुला रंग, माझं चित्र काढून झाल्यावर.

**ऊर्मी –** पण मी आधी घेतली होती पेटी. मला आत्ताच चित्र काढायचंय.

**निनाद –** बरं बाई. आपण असं करू यातले निम्मे खडू तू घे आणि निम्मे मी घेतो. चालेल? आपण डोळे मिटून तीन तीन उचलू.

**ऊर्मी –** पण मग माझे खडू मी नाही देणार तुला. तू भांडतोस ना माझ्याशी!

**निनाद –** मीपण नाही देणार माझे खडू तुला. मला नाहीच बोलायचंय तुझ्याशी.

**(दोघं डोळे मिटून खडू उचलतात. निनादला हिरवा, निळा आणि काळा खडू मिळतात. ऊर्मीला लाल, पिवळा आणि केशरी खडू मिळतात. निनाद सशाचं चित्र काढतो. पण त्याला सशाचे डोळे रंगवता येत नाहीत.)**

**निनाद –** सशाचे डोळे लाल असतात पण हे काय नुसतं चित्रच तर आहे. काढले हिरवे डोळे मांजरासारखे तर काय होईल? काहीच नाही.

**(निनाद सशाचे हिरवे डोळे काढतो. तसा चित्रातून ससा टुणकन उडी मारून बाहेर येतो.)**

**ससा –** व्वा! एवढा मोठा झालास पण सशाचे डोळे हिरवे नसतात माहीत नाही? मी काय आता मांजरासारखं म्यांव करू?

**निनाद –** अरे माझ्याकडे लाल रंगच नाहीये ना. मी तुला निळे डोळे देऊ? नाहीतर काळे डोळे देतो. चालेल?

**ससा –** नको रे बाबा! माझे इतके छान लाल डोळे आहेत. गुंजेसारखे. मला नको हिरवे डोळे. जातोच मी कसा.

**(ससा टुण टुण उड्या मारत निघून जातो.)**

**निनाद –** जाऊ दे त्याला. तो गेला तर गेला. मी छान हिरवं गवत काढतो. निळी फुलं काढतो. आणि काळ्या रंगानं पक्षी काढतो.

**(निनाद चित्र काढतो. पक्षी काढतो पण सगळे काव काव करायला लागतात. तीन कावळे चित्रांमधून उडत बाहेर येतात.)**

**कावळा १ –** सगळे कावळे आव आव. बाकी पक्षी चले जाव.

**निनाद –** काय चाललंय तुझं? मी काय इथे कावळे काढले नाहीयेत. हा मोर आहे. केवढा मोठा पिसारा आहे बघ ना.

**कावळा २ –** याचा रंग कोणता आहे? काळा. मोर कधी काळा असतो का? नाही. मग हा कावळाच. त्याची पिसं वाढली आहेत. कापायला हवीत. काव काव काव.

**निनाद –** पण हा तर पोपट आहे. चोच बघ कशी बाकदार आहे.

**कावळा ३ –** हॅ! आमची चोचपण चांगली बाकदार असते. हा कसला पोपट? राघू हिरवा असतो. हा काळा आहे. हा पण कावळाच.

**कावळा १–** सगळे कावळे आव आव. बाकी पक्षी चले जाव. एक गोल फेरी मारून कावळे उडून जातात.

**(ऊर्मी रंगीत फुलं काढते. देठ केशरी, पानं पिवळी, फुलं लाल. एक फूल बाहेर येतं. नखरे करत ऊर्मीला म्हणतं.)**

**फूल १ –** मी जास्वंद आहे. लाल आहे. पण माझी पानं हिरवी असतात. पानं हिरवी नसतील तर फूल येणार नाही झाडावर. एवढं माहीत नाही तुला?

**ऊर्मी –** पण पानांना थोडं रंगीत केलं तर काय होतं? पिवळा रंग किती छान दिसतोय.

**पान १ – (वेडावून दाखवत)** – पिवळा रंग किती छान दिसतोय म्हणे! इथं मी पार गळून गेलोय. शक्ती संपली माझी. पिवळा पडलोय. तुला माहिती नाही हिरव्या रंगात झाडाची शक्ती असते?

**(पान दमते आणि गळून खाली पडते. सोनटिकलीची तीन फुले बाहेर येतात.)**

**फूल २ –** सोनटिकली केशरीच असते.

**फूल ३ –** पण आम्हांला देठ आणि पानं हिरवीच लागतात.

**फूल ४ –** अन्नच मिळालं नाही तर आम्ही फुलणार कशा?

**(सगळी फुले कोमेजून, गळून पडतात. ऊर्मी भांबावून जाते.)**

**ऊर्मी –** ही फुलं मोठी नखऱ्याची. मी आता आजीचंच चित्र काढते.

**आजी –** उर्मी छानच रंगवलंस मला. सगळं नुसतं लालम लाल. **(हसते.)** पण माझं नाक आणि डोळे पण लालच? काय म्हणावं तुला?

**ऊर्मी –** आजी तू रंगपंचमी खेळली आहेस. **(हसते.)**

**आजी –** म्हातारपणी रंगपंचमी खेळायला लावतेस? चांगलीच रागावलेय मी. डोळे लाल लाल झालेत हां माझे. माझी चेष्टा करतेस? रट्टाच देते एक तुला.

**(इतक्यात घंटा वाजते.)**

**आजी –** उर्मी हे असलं रंगीत ध्यान काय बरं दिसत नाही. मी जातेय. **(आजी निघून जाते.)**

**(निनाद दार उघडतो. आई आत येते.)**

**आई –** काय चाललंय दोघांचं?

**निनाद –** काही नाही. चित्रं काढत होतो आम्ही.

**आई –** हो का? बघू बरं?

**निनाद –** पण सगळी चित्रं निघून गेली.

**आई –** निघून गेली? म्हणजे काय?

**निनाद –** आमचे रंग पुरले नाहीत. ते आमच्या चित्रांना आवडले नाहीत. मग ती निघून गेली.

**ऊर्मी –** हो ना गं आई. मी आजीचं चित्र काढलं होतं पण चित्रातली आजी माझ्यावर रागावली. लाल लाल रंगात तिला बुडवलं म्हणून. मग ती निघून गेली.

**आई – (चित्रं बघते. हसते.)** भांडलात– हो की नाही? एकमेकांचे रंग दिलेच नाहीत एकमेकांना? हो ना? मग चित्रं रागावणारच की. सगळे रंग नीट दिसायला हवेत ना? एकमेकांचे रंग वापरायचे असतात. चला आता सगळे रंग वापरून चित्रं काढा. समजूतीनं घ्यावं. रंग सगळ्यांचे असतात.

निनाद आणि ऊर्मी सगळे रंग वापरून चित्र काढतात. हिरवी झाडं. रंगीत फुलं आणि पक्षी. मुलं झाडांभोवती नाचतात. इतक्यात घंटा वाजते. मामा आजीला घेऊन दारात उभा आहे.

**आई –** ये ये! वाटच बघत होते. मुलं म्हणतच होती आजीला आपल्याकडे बोलाव राहायला.

**निनाद, ऊर्मी –** आजी आली. आजी आम्ही तुझं चित्रं काढणार दोघं मिळून. आजी प्रेमाने त्यांना कुशीत घेते.

**संपर्क :** onlyvandan@gmail.com

# चला चित्र रंगवूया...!!!

रेश्मा बर्वे

पिंटूने छान चित्र रंगवून ठेवलं होतं. रंगपंचमीच्या दिवशी काय गंमत झाली, चित्रातले सगळे रंगच बदलून गेले. हिरवं गवत खाणारे ससे झाले हिरव्या पोपटी रंगाचे. गवत झालं निळं अन आकाश झालं गुलाबी ! नारळाच्या जांभळ्या झाडाला लागले रंगीत फुगे ! डोंगर झाले लाल आणि सूर्य झाला आकाशी ! तुम्हीही तसंच चित्र रंगवून पहा.



अच्युत गोडबोले



# AI आणि शेती

स्ट्रॉबेरी, मलबेरी यासारख्या वेगवेगळ्या 'बेरी' फळांमधलं एक अतिशय मऊ फळ म्हणजे रासबेरी. हे फळ इतकं मऊ असतं की ते तोडताना आपल्या कौशल्याची कसोटी लागते ! त्यामुळे रासबेरी तोडताना लोकांना अतिशय काळजीपूर्वक काम करायला लागतं.

२०२२ मध्ये युरोपभर शेतामध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळाची कमतरता भासायला लागली. या काळात फळं तोडणारे रोबॉट्स अस्तित्वात असले तरी रासबेरी तोडण्याचं कौशल्य असणारे रोबॉट्स अजून तरी दिसत नव्हते. २०२२ मध्ये मात्र रासबेरी तोडणारा रोबॉट बनवण्यात 'फील्डवर्क रोबॉटिक्स' नावाच्या कंपनीला यश आलं. चार हात असणारा हा रोबॉट वेगवेगळ्या उंचीच्या झाडांवरून अगदी सहजपणे रासबेरी तोडायचा! महत्त्वाचं म्हणजे तो अलगदपणे तोडलेल्या रासबेरी किती पिकलेत ते पाहून त्यांचं नीट वर्गीकरण करून ठेवायचा. एखादा माणूस ८ तासांच्या शिफ्टमध्ये १५,००० रासबेरी तोडू शकतो. पण, हा रोबॉट तितक्याच वेळेत २५,००० रासबेरी तोडू शकायचा !

रासबेरी तोडण्याचं अवघड काम त्या रोबॉटला कसं जमायचं? १.८ मीटर उंची असणाऱ्या या रोबॉटमध्ये

सेन्सर्स आणि कॅमेरा बसवलेले असायचे. AI चं तंत्रज्ञान वापरत या रोबॉटला समोरच्या फांदीवर रासबेरी नेमकी कुठे आहे ते ओळखता यायचं ! मग हातांच्या हालचालींवर पूर्ण नियंत्रण ठेवत तो समोरची रासबेरी तोडायचा ! हाच रोबॉट वापरून चीनमध्ये टोमॅटो तोडण्याचे प्रयोगही केले गेले. सफरचंद तोडण्याचं कामही रोबॉट्स सफाईनं करतात.

रासबेरी तोडणारा रोबॉट म्हणजे AI तंत्रज्ञान कृषिक्षेत्रात काय करू शकतं याचं फक्त एक उदाहरण आहे. आज प्रगत राष्ट्रांमध्ये कृषिक्षेत्रात AI तंत्रज्ञानानं अनेक मार्गांनी प्रवेश केलेला पाहायला मिळतो. कृषिक्षेत्रात AI तंत्रज्ञान काय उलथापालथ करू शकते हे दाखवून देणारा एक प्रयोग इंग्लंडमध्ये २०१६ मध्ये करण्यात आला. हार्पर ॲडम्स युनिव्हर्सिटी आणि प्रिसिजन डिसिजन्स लिमिटेड यांनी एकत्रीत्या या प्रयोगावर काम केलं होतं. या प्रयोगाचं नाव होतं 'हॅन्ड्स फ्री हेक्टर'. कारण या प्रयोगात एक हेक्टर जमिनीवर मानवी कष्टाशिवाय शेती करण्यात येणार होती ! या प्रयोगासाठी २ लाख पौंड्सचा निधी मंजूर करण्यात आला होता. ड्रोन्स, लहान मशीन्स, कॅमेरा फक्त अशी यंत्रणा वापरत या शेतात ४.५ टन 'बार्ली' या धान्याचं उत्पादन झालं. या प्रयोगाला आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगलीच प्रसिद्धी मिळाली. पुढच्याच वर्षी हाच प्रयोग करत गव्हाचं पीक घेण्यात आलं. या प्रयोगानं शेतीतल्या कामाचं किती ऑटोमेशन होऊ शकतं याची झलक जगाला मिळाली ! पेरणी, कापणी, खतफवारणी, अशा सगळ्या गोष्टी आज रोबॉट्स, ड्रोन्स आणि इतर यंत्र यांच्यामुळे शक्य होते आहे.

कृषिक्षेत्रात ऑटोमेशन करणारं एक महत्त्वाचं उपकरण म्हणजे 'ड्रोन'. शेतीची सतत पाहणी करण्यासाठी ड्रोन्समुळे शेतात प्रत्यक्ष जाण्याची गरज उरत नाही. घरात बसून शेतीची पाहणी करण्याचं काम ड्रोन्समुळेच शक्य होतं. पिकांसाठी असणारा एक धोका म्हणजे टोळ. टोळ अख्खं पीक एका रात्रीत फस्त करू शकतात ! टोळांचा बंदोबस्त करण्यासाठी ड्रोन्स खूपच उपयोगी पडतात. पिकांचं कमीत कमी नुकसान करत टोळांना संपवणं ड्रोन्समुळेच शक्य होतं. शेतामध्ये योग्य वेळी योग्य प्रमाणात कीटकनाशकं फवारणं ड्रोन्समुळेच शक्य होतं. बिया पेरणारे, तसंच लहान रोपटी लावणारे ड्रोन्सही आता तयार करण्यात येत आहेत ! पिकांना योग्य प्रमाणात पाणी देणंही ड्रोन्समुळे सोपं झालं आहे.




AI तंत्रज्ञानाचा वापर पशूपालनातही होताना दिसत आहे. पाळीव जनावरांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी प्राण्यांना अंगावर घालता येतील अशी उपकरणे (Wearable Devices) जोडण्यात येतात. उदा. गाईच्या कानात असं डिवाइस बसवता येतं. मग ती गाय किती खाते, तिचं आरोग्य ठीक आहे का, ती कुठे जाते, तिला कसल्याही उपचाराची गरज आहे का अशा प्रश्नांची उत्तरं आपल्याला सहजासहजी मिळायला लागतात. मेंढ्यांच्या कळपाचे फोटो पाहून त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांना काही वेदना होत आहेत का या प्रश्नाचं उत्तर सांगणारं AI तंत्रज्ञानही वापरलं जातं ! यामुळे मेंढ्यांना होणारे संसर्गजन्य आजारही पटकन कळतात. पोल्ट्रीमध्ये कोंबड्यांना खायला देणं, त्यांची अंडी जमा करणं आणि तिथली साफसफाई करणं अशी कामं करणारे रोबॉट्सही वापरात आहेत. पोल्ट्रीमधल्या कोंबड्यांचे आवाज ऐकून त्यांना काही वेदना होत आहेत का याचा शोध घेणारं AI सॉफ्टवेअरही बनवण्यात आलंय !

डिजिटल ट्वीन या तंत्रज्ञानाचा उपयोग करून कुठे, काय, किती आणि केव्हा पेरावं, त्याला खतपाणी केव्हा, कुठलं आणि किती घालावं, कापणी केव्हा करावी हे ठरवता येतं.

**संपर्क** : achyutgodbole@gmail.com



# हुतात्मा नारायण वारके

डॉ. मारुती गुरव

बालमित्रांनो, ही कथा आहे एका स्वातंत्र्यवीराची. महात्मा गांधीजींनी आठ ऑगस्ट १९४२ रोजी 'चलेजाव' ची घोषणा केली आणि सारा देश स्वातंत्र्यासाठी पेटून उठला.

करवीर (कोल्हापूर) संस्थानात चळवळीचे लोन पसरले. कलनाकवाडी गावातील दाजी वारके आणि आई मुक्ताबाई यांच्या पोटी जन्म घेतलेला नारायण वारके हा तरुण इंजिनिअर होण्याचे स्वप्न अपुरे ठेवून 'प्रजापती परिषदेच्या' वतीने भाई माधवराव बागल आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या

मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य चळवळीत सामील झाला. अहिंसेच्या मार्गाने गतिमान झालेल्या आंदोलनात आबाल वृद्धांचा सहभाग लक्षणीय होता, नारायणाने वेशभूषा बदलून गारगोटी कचेरी समोरील वृक्षाच्या छायेत समुदायाला स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. सभा संपताच पोलिसांनी नारायणचा पाठलाग केला. नारायणाने वेदगंगा नदीतून पोहून जाऊन आजोबा बाळा सारंग आकुर्डे यांच्या घरी जाऊन धनगरी वेश परिधान करून पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी एका पालात आसरा घेतला.

नारायणचा पोलिसांनी खूप शोध घेतला.नारायण सापडला नसल्याने हात हलवत पोलीस कचेरीत परतले. नारायण अंधाऱ्या रात्री पालीच्या गुहेकडे पायवाटेने गेला. नारायणसह सर्व क्रांतिकारकांवर पकड वॉरंट काढण्यात आले. त्यामुळे १५ ते २० क्रांतिकारक घनदाट जंगलातील पालीच्या गुहेत चळवळीची पुढील दिशा ठरवत होते.

सैन्य भरतीसाठी इंग्रज अधिकारी गारगोटीला येणार असल्याची खबर मिळाली.नारायण पायवाटेने कलनाकवाडीत आला. शेकडो तरुणांच्या मदतीने त्याने अधिकाऱ्याची गाडी अडवली. त्याला खाली उतरवून हातात तिरंगा झेंडा देऊन ‘भारत माता की जय’च्या घोषणा देऊन कोल्हापूरला पाठवले.

नारायणच्या धाडसाने पोलीस खाते चक्रावून गेले. त्यामुळे तरुणांमध्ये देशप्रेमाची चेतना निर्माण झाली. जबरदस्तीने शेतसारा, दंड वसूल करून, गारगोटी कचेरीतील खजिन्यात जमा होत होता. नारायणाने क्रांतीकारकांमार्फत गारगोटी खजिन्याची माहिती गुप्तपणे मिळवली. १३ डिसेंबर १९४२ च्या रात्री खजिन्यावर हल्ला करण्याचे ठरले. त्याआधी दिनांक ११ डिसेंबरच्या रात्री निजामुद्दीन काझी, नारायण वारके यांसह अनेक क्रांतिकारांचा कुरचा पूल उडवण्याचा कट फसला होता. नंतर दिनांक १३ डिसेंबर १९४२ च्या मध्यरात्री गारगोटी कचेरीवर हल्ला करण्यासाठी सुमारे ७० क्रांतिकारांनी गारगोटीच्या इंजुबाई मंदिरात स्वातंत्र्याची शपथ घेतली.

गारगोटीतील कचेरीच्या दिशेने चार गट तयार करून सर्व जण निघाले. एका गटाने पोलीस क्वार्टर्सना बाहेरून कड्या घातल्या. कचेरीच्या आवारात रात्रीच्या पहाऱ्यावर कांबळे पोलीस होता. सर्व क्रांतिकारक आवारात पोहोचले. वाऱ्याच्या वेगाने करवीरय्या स्वामींनी कांबळे पोलिसाच्या अंगावर झेप घेऊन बंदूक पकडली. कांबळे पोलिसाने स्वामींच्या पोटावर बंदुकीची नळी नेऊन चाप ओढला. त्याचबरोबर ठो ठो असा आवाज होऊन बंदुकीची गोळी स्वामींच्या पोटात शिरली.

स्वामी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून नारायणाचा राग अनावर झाला. त्याने कांबळे पोलिसाचा गळा आवळला. त्या वेळी स्वामी म्हणाले, ‘‘आपल्या देशाचा तो नागरिक आहे. माझ्या रक्ताची शपथ. त्याला मारू नका.’’ ‘जय हिंद’ म्हणून स्वामी हुतात्मा झाले. सगळीकडे गोंधळ उडाला. खिडकीतून गोळीबार सुरू झाला. तुकाराम भारमल, शंकर इंगळे, मल्लू चौगुले, परशुराम साळुंखे, बळवंत जबडे, नारायण वारके या सात वीरांनी हौतात्म्य पत्करले. निजामुद्दीन काझी गंभीर जखमी झाले.


बाल मित्रांनो, या हुतात्म्यांच्या आठवणीसाठी गारगोटी कचेरी समोर क्रांतीज्योत उभारण्यात आली आहे.


***जयहिंद गर्जून, झुंज दिला जोशात***
***ते धारातीर्थी पडले वीर मराठे सात***


**संपर्क : ९४२११४२६४**

# इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची' मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिक कार्य नोंदवही
















नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना १५% सवलत




राज्यातील इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या. दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता तसेच उजळणीकरिता उपयुक्त.




वरील प्रात्यक्षिक कार्य नोंदवही खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा

**विभागीय भांडारे**

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

# नववर्षाचे स्वागतगीत

■ डॉ. मंदार परांजपे

आठवणींचा ठेवा ठेवून वर्ष जुने सरले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

नवी क्षितीजे आम्हां खुणविती नवीन वर्षाची..
अभ्यासाची, खेळाची अन् कलोपासनेची.
नवस्वप्नांचे गीत आज हे सहज आम्हां स्फुरले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

आनंदाचा खजिना जिंकू कला-क्रीडेमधुनी,
समस्यांवरी उपाय शोधू विज्ञानामधुनी.
उत्साहाचे वारे आमुच्या अंगी संचारले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

अंगिकारूया वाट निरोगी जीवन शैलीची,
राखण करूया वसुंधरेच्या पर्यावरणाची.
या ध्येयाचे बीज आमुच्या मनात अंकुरले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

परस्परांना जोडूया स्नेहाच्या धाग्याने,
देशाला बळकट बनवूया अतूट ऐक्याने.
सौहार्दाच्या शक्ती समोर द्वेष, सूड हरले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

अफवा आणि व्यसनांपासून दूर आम्ही राहू,
शहानिशा करू शकण्याइतके जागरूक राहू.
विवेकबुद्धीच्या कवचाने सदा आम्हां तारले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

स्वागत करूया नववर्षाचे उघड्या डोळ्यांनी,
शेवट करू स्वागत गीताचा शंभर टाळ्यांनी !
या टाळ्यांनी आमच्या वरचे आकाश झंकारले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

आठवणींचा ठेवा ठेवून वर्ष जुने सरले,
उंबरठ्यावर नववर्षाचे पाऊल अवतरले.

संपर्क : ९८२२३ २५९३६



**डॉ. नीलिमा गुंडी**

# अक्षरांची मैत्री

‘‘आई, ही जोडाक्षरं लिहिणं म्हणजे कठीण काम आहे गं. कधी एक अक्षर दुसऱ्याला जवळ घेतं, कधी त्याला डोक्यावर घेतं. तर कधी पायाशी ठेवतं! एकच एक प्रकार नाही. मग आम्हां मुलांचा गोंधळ होतो. आमची जराशी चूक झाली की शब्दाचा अर्थ बदलतो. कधी अर्थ लागतच नाही! कधी आमच्याकडून ‘दऱ्या’ ऐवजी ‘दर्या’ लिहिलं गेलं की अर्थाचा पत्ता कसा सापडणार?’’ केदार वैतागून म्हणाला


आईने घरी समोरच असलेल्या झाडांकडे त्याचे लक्ष वेधले. ‘‘ती येतात का? नीट बघ. काही झाडांची फुलं पानात लपलेली असतात. काही झाडांच्या फुलांचे गुच्छ येतात. काही फुले स्वतंत्रपणे येतात. काही फुलं तर चक्क झाडाच्या शेंड्यावर येतात. आणि हो, ती बुचाची फुलं पाहिलीस का? ती जणू ‘खाली डोकं, वर पाय’ अशी लोंबत आहेत! निसर्गात किती विविधता आहे. आहे ना? त्यामुळे निसर्ग छान दिसतो. तशीच विविधता आपल्या लेखनातदेखील असते.’’

‘‘ते सगळं खरं! पण आम्ही लक्षात कसं ठेवायचं?’’ केदारचे रडगाणे सुरूच होते. ‘‘त्यासाठी आपण निरीक्षणातून काही सूत्रं, काही युक्त्या शोधण्याचा प्रयत्न करायचा! मी तुला आता ‘प’ हे अक्षर जोडाक्षर या रूपात किती वेगवेगळ्या प्रकारे समोर येतं, त्याची उदाहरणं देते. तू लिही पाहू.

१) तत्पर २) गप्पा ३) दप्तर ४) अप्रतिम ५) कल्पना ६) कस्पट ७) स्वप्न, ८) प्लेग ९) पुष्प १०) फुप्फुस ११) अर्पण १२) अप्सरा १३) प्यादे

लिहिलीस ना!’’

त्याने लिहिलेले शब्द पाहून आई म्हणाली, ‘‘अरे, तू ‘तत्पर’ हा शब्द ‘तप्तर’ असा दप्तर’ सारखा लिहिला आहेस. तिथे ‘त’ चा उच्चार आधी असतो. तसंच ‘अप्सरा’



न लिहिला 'अस्परा' लिहिलं आहेस. ते दोन्ही शब्द पुन्हा लिही पाहू!''

केदारने चुका दुरुस्त केल्यावर आईने त्याला समजावून सांगितले, ''आता यात काही शब्दांमध्ये जोडाक्षर लिहिताना दोन अक्षरांची आडवी जुळणी आहे. उदा. कस्पट, पुष्प, कल्पना! शोध पाहू अशा जोडणीचे आणखी शब्द!''

केदार एकदम हसतहसत ओरडलाच, ''आई, 'गप्पा' या शब्दात आडवी जोडणी आहे. दोन 'प' एकमेकांशी खरंच गप्पा मारताना दिसतात. बघ!'' ते ऐकून आईही हसू लागली नि म्हणाली, ''अरे, जोडाक्षरे म्हणजे अक्षरांची मैत्रीच एका प्रकारे! आपण त्यांच्या मैत्रीत अडथळा आणायचा नाही. नीट जोडूनच अक्षरं लिहायची... कळलं!'' मग ती पुन्हा म्हणाली, ''अरे, यात काही ठिकाणी अक्षरांची उभी जोडणी आहे. आली का लक्षात? दप्तर, स्वप्न, अप्रतिम हे शब्द नीट पाहा बरं! त्यांचा उच्चारही करून पाहा. त्यात 'प' हा वर्ण अर्धा आहे. बरं का! त्यात 'प' चा उच्चार आधी होतो. हे लक्षात ठेव! कळलं?'' यावर केदारने मान डोलावली.

''अरे, 'अप्रतिम' या शब्दात 'प' ला 'र' जोडून येताना त्याची रेष दिसतेय ना! 'र' हे अक्षर जोडाक्षरात किती रूपं घेतं, ते आता बघ. लिही – १) श्री २) गर्व ३) पत्र ४) स्रोत ५) पऱ्या.

केदारने लिहिलेले शब्द पाहून आई म्हणाली, ''छान! तुला कळलं का की 'श्र' हे अक्षर म्हणजे श आणि र चे जोडाक्षर आहे. त्यात अर्ध्या 'श' चे 'श्र' असे रूप झाले आहे. आता श्रीखंड खाताना हे लक्षात ठेवत जा!'' यावर केदारने हसून दाद दिली. आईला खूपच गोष्टी लक्षात आणून द्यायच्या होत्या. ती म्हणाली, ''अरे, इतर अक्षरांसारखा




'र' या अक्षरात दंड नसतो. त्यामुळे तो जोडाक्षरात किती रूपं घेतो बघ! मुख्य म्हणजे ही युक्ती लक्षात ठेव. जोडाक्षरात 'र'चा उच्चार जेव्हा दुसऱ्या अक्षराच्या आधी येतो, तेव्हा तो दुसऱ्या अक्षराच्या डोक्यावर बसतो! आणि जेव्हा 'र' चा उच्चार जोडाक्षरात दुसऱ्या अक्षरानंतर असतो; तेव्हा तो त्या अक्षराच्या पोटातील रेष बनतो! तसंच श हे अक्षरही जोडाक्षरात आणखी एक रूप घेतं. 'आवश्यक' या शब्दात 'श्' असं त्याचं अर्ध रूप आहे आणि 'विश्वास' मध्ये 'श्' हे रूप आहे.''

केदारला युक्ती कळल्याचा आनंद झाला. तो म्हणाला, ''आई, आई, मी आता मनात उच्चार करून बरोबर लिहीन''. सर्प आणि 'वक्र' या दोन शब्दांकडेच बघ! 'र' कधी डोक्यावरचा तुरा होतो आणि कधी पोटातला सुरा होतो, ते मी ओळखीन! आणि हो ! 'पऱ्या' लिहितानाही 'र' चा उच्चार आधी आहे. मात्र त्याच्यावर जोर नाही. म्हणून तो आणखीन वेगळ्या रूपात आहे. हो की नाही?'' ''शाब्बास! यालाच म्हणतात, अभ्यासातली गंमत कळणे!'' आईने त्याला शाबासकी दिली आणि ताजी द्राक्षेही दिली!

**संपर्क : ०२०–२४४८६०१५**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक सचिन मेहता यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Sachin Mehta, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil**

राहुल हांडे



# डास आणि डासी

डासांना मारण्यासाठी मानव नवीननवीन उपाय शोधत आहे, मात्र या उपायांवर डास यशस्वी मात करत आहेत. मानवी लोकसंख्येची सर्वात जास्त हानी डासांमुळे झाली आहे. आजवर या पृथ्वीतलावर जन्माला आलेल्या सुमारे १०० अब्ज मानवांपैकी निम्म्या लोकसंख्येचा फडशा डासांपासून झालेल्या रोगांमुळे झाला आहे असं काही शास्त्रज्ञ म्हणतात. आताही दरवर्षी जगभरातील सुमारे ८ लाख लोक डासांपासून झालेल्या रोगांमुळे मृत्युमुखी पडतात. या धरतीवर डासांच्या ३५०० पेक्षा जास्त प्रजाती असल्या तरी त्यातील केवळ ६% प्रजाती मानवाला चावतात. डासांच्या वेगवेगळ्या प्रजातीने त्यांचा रक्तदाता प्राणी, पक्षी निवडला आहे. काही डास केवळ माकडांना चावतात. या ६ टक्के प्रजातीतील केवळ मादी डास रक्तपिपासू असतात, नर नाही!

डास घराण्यातील पुरुष पूर्ण शाकाहारी असतात. मादी देखील केवळ नाइलाज म्हणून तुमचे रक्त पितात. कारण त्यांना अंडी घालण्यासाठी अधिक प्रोटीन्सची आवश्यकता असते. मानवी जन्माची आपण किती तयारी करतो, गर्भवती स्त्रियांनी आवश्यक आहार घ्यावा यासाठी आपण किती आग्रही असतो. मग बिचाऱ्या डास मादीने तिच्या होणाऱ्या बाळांसाठी तुमचे थोडे रक्त पिले तर काय फरक पडतो. तुमच्या शरीरातील एकूण रक्तावर १२ लाख डास पोसले जाऊ शकतात. मग होऊ द्या की थोडा खर्च. आधीच सर्व डासांचे पुल्लिंगी उच्चारण करून तुम्ही त्यातील स्त्री जातीचं अस्तित्वच नाकारलं आहे. आता जरा परतफेड करा की!

डासापासून होणाऱ्या मलेरियाची दहशत हजारो वर्षांपासून आहे. मात्र डास चावल्यामुळे मलेरिया होतो हे समजायला १८९७ हे वर्ष उजाडावं लागलं. आरोग्यशास्त्राचा जनक हिपॉक्रेट्सने मलेरियाचा संबंध नक्षत्रांशी जोडला होता. मल एअर अर्थात 'अशुद्ध हवा' अशी मलेरिया या नावाची व्युत्पत्ती सांगता येते. डासी चावल्यानंतर तिथे सूज का येते तुम्हांला ठाऊक आहे

का? कारण रक्त पिताना त्याची गाठ होऊन स्ट्रॉ जाम होऊ नये म्हणून डासी आधी आपल्या त्वचेमध्ये त्यांची लाळ सोडतात. त्यामुळे रक्त थोडं पातळ होतं आणि डासींना तो ज्यूस सहज पिणे शक्य होतं. आजारदेखील डासी या लाळेमधूनच आपल्याला नकळत देत असते. पण तिचा उद्देश खरंच तसा वाईट नसतो. मातेला पोरांसाठी करावे लागते. मिलन झाल्यावर नर काही दिवसात मेलेला असतो, ही बिचारी सिंगल मदर असते.

फुलपाखराप्रमाणे डासांच्या जीवनचक्रामध्ये देखील अंडी, डिंभ, कोश आणि पूर्ण वाढ झालेला... अशा चार अवस्था असतात. पोषणासाठी अनुकूल असलेल्या ठिकाणी अंडी घातली जातात. नर डासाचं आयुष्य कमी असतं. जास्तीत जास्त दोन महिने तो जगतो, मिलन झाल्यानंतर तर तो केवळ पाच-सहा दिवसच जगतो. मादी डास साधारणतः तीन महिने जगते आणि दर २१ दिवसांनी अंडी घालते. एका वेळेस साधारणतः ३०० अंडी घातली जातात. बहुतेक प्रजाती या मध, पराग आणि फळांच्या रसावर जगतात. दहा दिवसांत डासाचं पिल्लू पाण्याबाहेर येऊन उडायला शिकतं. तोवर त्याचे अनेक भाऊ बहीण मासे, बेडूक यांनी खाल्लेले असतात. डास हे अगदी लहान मुलांप्रमाणे असतात. जेव्हा घरात असूनदेखील त्यांचा आवाज येत नसेल तर समजून चला, नक्कीच ते काहीतरी उद्योग करत आहेत.

डासांच्या मेंदूमध्ये केवळ दहा पेशी असतात. त्यांची दृष्टीदेखील अतिशय कमजोर असते. दोन्ही बाजूला डोळे असूनदेखील डासांची नजर अतिशय कमजोर असते. त्यामुळे आपल्या तीव्र घ्राणेंद्रियाचा वापर करून ते आपले सावज शोधत असतात. डास हा अन्नसाखळीमधील महत्त्वाचा भाग आहे. वनस्पतीतील रस शोषून गुजराण करणाऱ्या डासांच्या जाती परागीभवन करत असतात. अनेक पक्षी, वटवाघळ या प्रौढ डासांवर आपली गुजराण करत असतात. डिंभ स्वरूपात ते मासे, बदक आणि बेडकांचे खाद्य असतात. मलेरिया, पिवळा ताप, हत्तीपाय, चिकन गुनिया, झिका, डेंग्यू यांसारखे आजार देणारे डास हे १०० पेक्षा कमी तापमानात जिवंत राहू शकत नाहीत. १५-२५० हे त्यांच्यासाठी आदर्श हवामान.

मानवाच्या श्वासामधून कार्बन डाय-ऑक्साइड उत्सर्जित होत असतो, ज्यासाठी डास अतिशय संवेदनशील असतात. ७५ फुटांवरून देखील त्यांना जाणीव होते, की मला आवश्यक असलेली रक्तपेढी जवळ आहे. दोन व्यक्तींपैकी ज्याचा शरीराचा, घामाचा वास जास्त येत असेल, त्याला डास चावण्याची शक्यता अधिक असते. डास उष्णतेचे देखील चांगले शोधक असतात, मानवी शरीराच्या तापमानावरून त्यांना मानवी अस्तित्व लक्षात येते. गर्भवती अवस्थेत महिलांच्या शरीराचे तापमान काहीसं जास्त असल्यानं, तसेच हार्मोनल बदल झाल्याने शरीराला येत असलेल्या वेगळ्या गंधामुळे गर्भवती महिलांना डास अधिक चावू शकतात.

जागतिक तापमानासोबत मलेरियाचे प्रमाणदेखील वाढत आहे. पूर्वी मलेरियाचा प्रादुर्भाव नसलेल्या थंड हवेच्या भागात देखील मलेरियावाहक डासांची वाढ होत असल्याचे संशोधकांना आढळून आले आहे. वाढते तापमान सहन न झाल्याने हे कीटक विषुववृत्तापासून दूर जाऊ पाहत असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर मलेरियाचे प्रमाण कमी होत असले तरी टांझानिया, केनिया यांसारख्या देशात हे प्रमाण वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने २०२१ मध्ये आफ्रिकन देशात मलेरियाची सुमारे २५ कोटी प्रकरणे नोंदवली असून त्यातील निम्म्यापेक्षा जास्त प्रकरणे नायजेरिया, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, युगांडा आणि मोझांबिक या देशांमधून समोर आली आहे.

केवळ मानवच नाही तर स्थानिक हवाईयन पक्षीदेखील यामुळे त्रस्त झाले असून डासांच्या घुसखोरीमुळे त्यांनी आपले क्षेत्र बदलले आहे. डास प्रतिवर्षी सुमारे साडेसहा मीटर उंच प्रदेशात स्थलांतरित होत आहेत. खूप दिवस पाऊस पडतो, तिथे डासांची संख्या वाढतेच, पण दुष्काळी भागात, जिथे पाणी साठवून ठेवले जाते, तिथे देखील डासांना प्रजननासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होते. २००४-०५ मध्ये केनियामध्ये झालेल्या चिकन

गुनियाच्या प्रादुर्भावाचा संबंध तत्कालीन दुष्काळाशी जोडता येतो. जिथे पाण्याची साठवणूक करून ठेवावी लागते तिथे 'गप्पी मासे पाळा आणि हिवताप टाळा' हा मंत्र ध्यानी धरावा लागणार आहे. कारण डासांनी पाण्यात घातलेली अंडी गप्पी मासे खाऊन टाकतात.

सर्वांत जुना, १० कोटी वर्षांपूर्वीचा डास जीवाश्म स्वरूपात म्यानमारमध्ये सापडला आहे. त्याला आपण आदीडास म्हणू शकतो. मानववंशाच्या इतिहासात, त्यातही मानवाने शेती करायला सुरूवात केली तेव्हापासून डास आणि मानव हे रक्ताचं नातं अगदी घट्ट आहे.. अगदी बोरिंग लोकांना सुद्धा एकटेपणाची जाणिव ही डास मंडळी होऊन देत नाहीत. डास आणि त्याची गुणगुण हा खरं तर महाकाव्याचा विषय. युद्ध आणि शांतीमध्ये डासाची भूमिका वेळोवेळी इतिहासात अधोरेखित झाली आहे. धार्मिक संघर्ष कमी केल्यामुळे मला डास आवडतात. कॅथोलिक आणि प्रोटेस्टंट यांचा संघर्ष तुम्हांला माहीत असेलच. मात्र या दोन्ही बाजू एकमेकांविरुद्ध दंड थोपटून उभ्या असताना डासांनी आपली निर्णायक भूमिका बजावली. मच्छरांच्या वाढलेल्या प्रादुर्भावामुळे प्रोटेस्टंट मंडळींनी कॅथोलिक बेटावर शरणागती मागितली आणि शेकडे वर्षे सुरू असलेला झगडा संपला.

इंग्लंडला 'ग्रेट ब्रिटन' करण्यामध्ये या मच्छर मंडळीची भूमिका महत्त्वाची आहे. इंग्लंडचे ग्रेट ब्रिटन होण्यामध्ये एक अडचण होती, स्कॉटलंडला स्वतःची स्वायत्तता गमवायची नव्हती. १६९८ मध्ये स्कॉटलंड वरून पाच जहाजे अतिशय महागडा व्यापारी माल आणि हजारो प्रवासी घेऊन अमेरिकेला निघाली. हे प्रवासी तिथं जाऊन आपली वसाहत निर्माण करणार होते आणि स्कॉटलंडसाठी पैसा कमावणार होते. मात्र तिथं त्यांच्या स्वागताला मच्छर तयार होते. मलेरियाने रोजच डझनावारी लोक मरू लागली. सहा महिन्यांत निम्मे लोक मेले. त्यांना वाचण्यासाठी बचावपथक जेव्हा पोचलं तेव्हा केवळ काही लोकच परत मायदेशात येऊ शकले आणि त्यांच्याकडे काहीही पैसा नव्हता. स्कॉटलंडचं दिवाळं वाजलं आणि त्यांच्यापुढे इंग्लंडमध्ये विलीन होण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही.

ज्याप्रमाणे अमेरिकन डासांचा त्रास युरोपियन लोकांना झाला त्याच पद्धतीने युरोपामधून गेलेले डास हे अमेरिकेतील लोकांसाठी कर्दनकाळ ठरले. कोलंबसने जेव्हा हिस्पानिओला बेटावर पहिलं पाऊल ठेवलं, तेव्हा तिथल्या मूलनिवासींची संख्या सुमारे ८० लाख होती. पुढील बावीस वर्षांतच तिथं केवळ २६००० मूलनिवासी जिवंत उरले होते. हे केवळ युरोपामधून अमेरिकेत गेलेल्या डासांनी पसरवलेल्या आजाराने केले होते. त्याआधी देखील अनेक लढाया निर्णायक करण्याची भूमिका डासांनी बजावली आहे. जेव्हा रोमन आपलं साम्राज्य वाढवू पाहत होते, तेव्हा स्कॉटलंड मोहिमेमध्ये मलेरियाने त्यांचं ऐंशी हजारपैकी चाळीस हजार सैन्य गारद केलं होतं. चंगेजखानाच्या आक्रमणाला त्याच्या सैन्यातील एक तृतीयांश सैन्य खल्लास करून मच्छरांनी मोठं आव्हान दिलं आणि त्यामुळे युरोपचं संरक्षण झालं होतं. दक्षिण अमेरिकन देशांच्या बंडाच्या काळात देखील मच्छरांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

विज्ञानाने खूपच प्रगती केली आहे, अनेक ठिकाणी जेनेटिकली तंत्राद्वारे निर्माण केलेले डास वापरून त्यांची लोकसंख्या नियंत्रणात आणत आहेत. पण मला तर वाटते, डास हे आपले मित्र कसे होतील यावर शास्त्रज्ञांनी भर दिला पाहिजे. विशेषतः अशा मच्छरांची प्रजाती शोधून काढायची, जी चरबीचं शोषण करेल, रक्ताचं नाही आणि चरबीचं शोषण करताना व्यक्तीला कळायला पण नको. मग काय राव.. जीमला जायला नको, डाएट करायला नको, घरात कोणती कॉईल लावायची नाही की मच्छरदाणी लावायची नाही. रात्री मस्त झोपायचं, मच्छर त्यांचे काम करतील. कशी वाटली आयडिया! जाता जाता एक जोक.. एका मच्छराचं बाळ पहिल्यांदा उडून चक्कर मारून आलं. घरी परत आल्यावर त्याच्या आईने विचारलं 'कसं वाटले रे..' तो म्हणाला, ''खूपच छान, सगळ्या माणसांनी माझं टाळ्या वाजवून स्वागत केलं.''

**संपर्क : ८९५६४४५३५७**

# फुलून ये

■ संतोष दौंडे



भिजून घे
रुजून घे
माळावरती
सजून घे

हवा घे
पाणी घे
काठावरची
गाणी घे

फुलून ये
डुलून ये
पोपड्यावाणी
उलून ये

संपर्क : ९५७९४३५००४

डॉ. शिवानी लिमये

# चैत्रांगण



चैत्र हा हिंदू कालगणनेतील पहिला महिना आहे. या महिन्यातील पौर्णिमेच्या सुमारास 'चित्रा' नक्षत्र असते, म्हणून या नक्षत्रावरून या महिन्याला 'चैत्र' हे नाव मिळाले आहे. याच महिन्यापासून वसंत ऋतू सुरू होतो.

चैत्र शुद्ध तृतीयेपासून पुढे महिनाभर म्हणजे अक्षय तृतीयेपर्यंत महाराष्ट्रात चैत्रगौर पूजन हा सण साजरा केला जातो. चैत्र शुद्ध तृतीयेपासून गौरीला देव्हाऱ्यात छोटासा झोपाळ्यावर बसवले जाते व पुढे महिनाभर तिची पूजा करतात. या महिन्यातील कोणत्याही मंगळवारी किंवा शुक्रवारी हळदीकुंकू करतात. त्यासाठी गौरीला वस्त्रालंकारांनी नटवतात, तिच्यापुढे रंगीबेरंगी चित्रे, नाना प्रकारची फळे व खाद्यपदार्थ मांडून आरास करतात. गौरीसमोर 'चैत्रांगण' नावाची एक वैशिष्ट्यपूर्ण रांगोळी काढतात.

आपली भारतीय संस्कृती अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. भारतीय संस्कृतीत रांगोळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. घराच्या भिंती रंगवून किंवा घरासमोर रांगोळी काढून घर सजवण्याची पद्धत प्रागैतिहासिक काळापासून प्रचलित आहे. महाराष्ट्रात चैत्रगौरीला माहेरवाशीण समजून मानाने, आनंदाने तिचे घरात स्वागत केले जाते. आपल्या संस्कृतीत ऋतूमानाप्रमाणे उपलब्ध गोष्टींचा सुयोग्य वापर हा सणाशी संबंधित चाली-रितींमध्ये प्रतिबिंबित झालेला दिसतो.

चैत्रात 'चैत्रांगण' ही रांगोळी काढताना गेरू किंवा कावेच्या सहाय्याने चौकोन तयार केला जातो. या चौकोनात शुभचिन्हे काढून चैत्रांगण ही रांगोळी काढली जाते.

निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच आजूबाजूच्या परिसरात सहज दिसणाऱ्या गोष्टी रांगोळीत रेखाटल्या जातात. या रांगोळीत आंब्याचे तोरण, देवघर, हत्ती, घोडा, गरुड, शंख, चक्र, गोपद्म, तुळशीवृंदावन, कलश, आंबा, पद्म सूर्य-चंद्र, गुढी व ध्वज अशी अनेक प्रतीके रेखाटली जातात. चैत्रांगणातून समृद्ध भारतीय संस्कृती प्रतिकात्मकरित्या सहजपणे दाखवली जाते.हळदी-कुंकू असेल त्या दिवशी या ऋतूत उपलब्ध असणारी कलिंगड, द्राक्षे, खरबूज या फळांनी आरास सजवली जाते. आलेल्या सुवासिनी व कुमारिकांचे स्वागत करून त्यांना या ऋतूत फुलणाऱ्या मोगऱ्याच्या फुलांचा गजरा दिला जातो. भिजवलेल्या हरभऱ्यांनी आणि फळांनी त्यांची ओटी भरतात. त्यांना आंब्याची डाळ व पन्हे देतात.

या उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील स्त्रिया घरोघरी जातात. त्यामुळे त्यांचा परिचय वाढतो, स्नेह वाढतो.

**संपर्क :** Limaye.shivani@gmail.com


**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट**
**अधिनियम - ११ बी**
**अन्वये प्रसिद्ध करायची माहिती**
**फॉर्म क्र. ४ (नियम- ८ पहा )**

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **प्रसिद्धीचा नियतकाल** | : | दरमहा |
| **मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव** | : | श्री. सचिन मेहता |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर, पु.ल. देशपांडे कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. |
| **संपादकाचे नाव** | : | श्री. कृष्णकुमार पाटील |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **मासिकाची मालकी** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. |


मी सचिन मेहता जाहीर करतो, की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

**१ मार्च २०२५**
मुंबई - ४०० ०२५.

**सचिन मेहता**
प्रकाशक

माधव गव्हाणे

# चिमणी



नेहमीप्रमाणे शाळेत गेल्यावर शालेय परिसर स्वच्छ करून घेतला आणि लागलीच परिपाठ झाला. आजचाही परिपाठ चांगला झाला होता. परिपाठानंतर सर्व विद्यार्थ्यांच्या पाठोपाठ आम्ही सर्व जण ही आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य घेऊन आपापल्या वर्गात गेलो. मी माझ्या वर्गात गेलो. वर्गात प्रवेश केल्यावर सर्वत्र गवताच्या काड्यांचा कचरा इतरत्र पडलेला दिसला. परिपाठापूर्वी झाडाझुड करून स्वच्छ केलेला वर्ग अचानक असा कसा झाला..? याची विचारणा केल्यास मुलांनी टिनपत्रांना आधारासाठी लावलेल्या आडव्या खांबाकडे बोट दाखवले आणि म्हणाले ''सर, येथे चिमणीचे घरटे होते, ते कशाने तरी खाली पडले आहे, पडत आहे.'' त्या पडणाऱ्या घरट्याकडे पाहून मला वाटले, की त्या घरट्यात पाखरांची अंडी किंवा पिल्लं असतील का....ती पडतील का..? पण त्या ठिकाणी काहीही नव्हते हे पाहून मनाला हायसे वाटले. पण...एक चिमणी मात्र त्या घरट्याभोवती सतत फेऱ्या मारत होती. कदाचित आलेल्या संकटामुळे विस्कटलेले घरटे सावरून पुन्हा बांधण्यासाठी ती प्रयत्न करीत होती. मी आणि माझ्या वर्गातील सर्व लेकरं चिमणीकडे आणि तिच्या घरट्याकडे बारकाईने पाहत होतो. चिमणीच्या हालचालींचे बारकाईनं निरीक्षण करत होतो. पसरून गेलेले घरटे नव्याने सावरण्यासाठी चिमणी धडपड करत चोचीत एक एक काडी आणि धाग्यासारखे काही पदार्थ आणून घर नव्याने तयार करत होती. हे सारं पाहताना मी मुलांना चिमणीच्या प्रयत्नशील वृत्तीविषयी माहिती सांगत होतो. तिने एवढी मेहनत करून अतिशय सुंदर बांधलेलं घरटं खाली पडून पूर्णतः उध्वस्त झाले होते, तरीही चिमणी त्याचे दुःख करत न बसता, न खचता पुन्हा नव्या उमेदीने, नव्याने घरटे बांधण्याच्या कामाला लागली होती. यासाठी लागणारे साहित्य मिळवण्यासाठी चिमणी जीवाचे रान करत होती. हे आम्ही सर्व जण पाहत होतो.' आपल्यातील शक्ती ओळखून सतत प्रयत्न करत राहिलो तर अनेक गोष्टी नव्याने साकारता येतात' हाच धडा चिमणी आम्हाला शिकवत होतो. चिमणी एवढीशी असून सुद्धा जिद्द, आत्मविश्वास आणि परिश्रमाच्या जोरावर सुंदर घरटे नव्याने साकारत होती. हा गुण आपणही चिमणीकडून घेतला पाहिजे. या वेळी मुलांना थोर कवयित्री बहिणाबाईंची खोपा कविता ऐकवली. या कवितेतील एक कडवं...

*''तिची उलूशीच चोच,*
*तेच दात तेच ओठ,*
*तुला देले रे देवानं,*
*दोन हातं दहा बोटं''*

प्रत्येक मानवाला खूप काही शिकवणारं असून प्रत्येकाला नवनिर्माण करण्यासाठी प्रेरणा देणारं आहे. आजची सकाळ पाठ्यक्रमातील कोणताही घटक न शिकता खूप काही शिकलो होतो. मानवाने आपल्या सुखसोयीसाठी निर्माण केलेल्या अशा अनेक यंत्रामुळे, वस्तूंमुळे निसर्गाचे तारणहार असलेल्या पक्ष्यांचे बळी जात आहेत....हे पाहून विज्ञान तंत्रज्ञान कुणासाठी हा प्रश्न मनात निर्माण झाला.. पण आपण सर्वांनी या गोष्टीवर विचार करून आपापल्या परीने प्रयत्न करत पाखरांचे जीव वाचवले पाहिजे यासाठी हा लेखप्रपंच केला आहे.


घरटे बनवणारी चिमणी आम्हाला प्रेरणा देत होती. शेवटच्या कार्यानुभव तासिकेत झाडांभोवताली आळे करताना एका छोट्या सागाच्या झाडाला असणाऱ्या मोठ्या पानाला एका आकाराने छोट्या असलेल्या शिंपी या पक्ष्याचे सुंदर, छोटेसे घरटे दिसले.. मानवाने कपडे शिवण्याची कल्पकता याच पक्ष्याकडून घेतली असावी असे मला वाटते. या पाखराची कल्पकता पाहून, कलाकारी बघून मन प्रसन्न झाले...अशा प्रकारे तो दिवस पाखरांच्या सान्निध्यात बरंच काही शिकत- शिकवत, मनावर बरंच काही बिंबवत निघून गेला...

*माणसांपेक्षा निसर्गाला,*
*पक्ष्यांनी जास्त जपलंय,*
*निसर्गाचं सौंदर्य मात्र,*
*स्वार्थी माणसांमुळे करपलंय..!*

**संपर्क : ९४०४८३३१००**

आराधना कुलकर्णी

# हुशार हिरव्या



एक होता बोका. धूर्त, लबाड, मोठ्या मोठ्या मिश्यांचा आणि चांगला गब्बूगब्बू! एकदा त्याची नजर एका छोट्याशा सुरवंटावर पडली. तो सुरवंट अगदी नाजूक, लोळागोळा वाटणारा, हिरव्या रंगाचा एक छोटासा जीव. बागेतल्या एका फुलझाडाच्या पानावर बसून त्याच पानाला मस्तपैकी खात होता.

खाता खाता अचानक त्याचे लक्ष बोक्याकडे गेले. त्याची खूपच घाबरगुंडी उडाली. आता आपली काही धडगत नाही. कुठे लपावे, कुठे पळावे हे त्याला सुचेना. त्याला पळताही येत नव्हते कारण तो अगदी हळूहळू सरपटणारा जीव होता.

बोक्याने त्याची भीती ओळखली. त्याला मोठी गंमत वाटली. तो त्याच्या अगदी जवळ गेला, तसा हिरव्या थरथर कापू लागला. पानावरून खाली पडतो की काय असे त्याला वाटले. बोक्याचे पोट तेव्हा भरलेले होते म्हणून लगेच हिरव्याला खाण्याची त्याची इच्छा नव्हती. जरा गंमत करावी असे त्याने ठरवले. तो त्याला म्हणाला, “अरे हिरव्या, घाबरू नकोस. मी तुला काहीच करणार नाही बरं!”

“खरंच ? किती दयाळू आहेस रे तू ! खरं तर तुम्ही मांजरं आमच्यावर टपूनच असता ना ? तुमच्यापासून चार हात लांब राहायचं असं आम्ही अंड्यातून बाहेर पडताच देवबाप्पा आम्हांला शिकवतो.” हिरव्या म्हणाला.

बोका म्हणाला,” नाही रे! घाबरू नकोस, मी काही इतका दुष्ट नाही बरं! आता मीच तुझं इतर मांजरांपासून रक्षण करेन. आपण दोघं आतापासून मित्र झालोत. आता जेव तू सावकाश. उद्या पुन्हा



येतो तुझ्याशी गप्पा मारायला."

एवढे बोलून बोका निघून गेला. त्या दोघांचेही बोलणे दुसऱ्या पानावरचा लाल्या सुरवंट ऐकत होता. लाल्या मग हिरव्याजवळ आला आणि म्हणाला, ''हिरव्या, त्या बोक्यावर विश्वास ठेवू नकोस. गोड गोड बोलणारे प्राणी फसवतात बरं का! आज नाहीतर उद्या, तुझ्यावर तो झडप घालणार हे नक्की लक्षात ठेव. हा माझा अनुभव मी तुला सांगत आहे. ऐक माझं. ही जागा सोडून ताबडतोब दुसरीकडे जा." त्याचे बोलणे ऐकून हिरव्या घाबरला. थोडा विचार करून तो आणखी वरच्या फांदीवर जाऊन बसला. दुसऱ्या दिवशी सकाळी बोका आला. आता त्याला सणकून भूक लागली होती. त्याच्याबरोबर आणखी एक बोका होता. तो हसत हसत त्या झाडाजवळ आला पण त्याला हिरव्या काही दिसेना. तो सोबतच्या बोक्याला ऐटीत, मिशा फेंदारत म्हणाला, ''कालच मी मैत्री केली बघ त्याच्याशी आणि आज त्याचाच फराळ करणार आहे. पण आत्ता दिसत नाहीय. कुठे गेला कोणास ठाऊक!"

त्याचे हे बोलणे हिरव्याने ऐकले. त्याला बोक्याचा खरा डाव समजला. तो न सापडल्यामुळे बोका चिडला, नाराज झाला व मिश्या फेंदारत रागारागाने परत गेला. मग हिरव्या लाल्याकडे गेला आणि त्याचे आभार मानले.

मग त्याने स्वतःच्या शरीरातून एक लांबच लांब आणि चिकट असा धागा काढायला सुरुवात केली. तो धागा त्याने स्वतःच्या शरीराभोवती गुंडाळून घेतला.

बघता बघता त्याचा एक गोल कोश तयार झाला. त्या कोशात हिरव्या लपून बसला.

दुपारी तो बोका पुन्हा आला व हिरव्याला शोधू लागला. त्याला काही हिरव्या सापडला नाही. रागाने गुरगुरतच तो निघून गेला. कोशात लपून बसलेला हिरव्या त्याला बघून मजेत हसू लागला.

दोनचार दिवसांनंतर कोश फोडून हिरव्या बाहेर आला आणि काय आश्चर्य! तेव्हा त्याला अतिशय सुंदर पंख फुटले होते. त्या पंखांवर हिरवे, सोनेरी पिवळे ठिपके होते.

हळूहळू सरपटणारा हिरव्या आता एक सुंदर फुलपाखरू झाला होता. पंख पसरून आनंदाने तो या फुलावरून त्या फुलावर उडू लागला.

असाच खेळत असताना एके ठिकाणी त्याला तोच बोका निवांत झोपलेला दिसला. त्याची खोड मोडावी असे त्यानं ठरवले. उडत उडत तो बोक्याच्या डोक्यावर भिरभिरू लागला. झोपमोड झाल्याने बोका चिडला. त्याला ते सुंदर फुलपाखरू दिसले. तो त्याला पंजा मारण्याचा प्रयत्न करू लागला पण त्याने पंजा उचलला की हिरव्या वर उडायचा, मग पुन्हा खाली यायचा. मग तो त्याच्या कानात शिरला. त्याच्या पंखामुळे बोक्याच्या कानात गुदगुल्या होऊ लागल्या. तो आणखीनच चिडला. पण हिरव्या काही त्याच्या पकडीत येत नव्हता.

शेवटी तो चिडून म्हणाला, ''का मला त्रास देतोस रे? मी तुझं काही बिघडवलं का?"

त्यावर हिरव्या म्हणाला, ''तुला ते जमलं नाही पण विचार तर तसाच केला होतास ना? माझ्या मित्रानं मला सावध केलं म्हणून मी वाचलो. तू मला ओळखलं की नाहीस?"

बोका म्हणाला, ''नाही ओळखलं. कोण आहेस तू?"

"अरे, मी हिरव्या. माझ्याशीच मैत्री केली होतीस तू आणि माझं रक्षण करण्याचं वचनही दिलं होतंस. पण खरं तर तू मला खाणार होतास हे मी तुझ्या तोंडूनच प्रत्यक्ष ऐकलं होतं. गोड बोलून मैत्रीचं नाटक केलंस तू. मी तरी तुझं काय बिघडवलं होतं रे?"

आता बोक्याच्या लक्षात आले की ते फुलपाखरू म्हणजे हिरव्याच होता. तो मनात खजील झाला आणि म्हणाला, ''ए, चुकलंच हं माझं. आता मी तुला खरंच त्रास नाही देणार."

हिरव्या म्हणाला, "स्वभाव ओळखल्याशिवाय कुणावर एकदम विश्वास टाकू नये हे मीपण शिकलोय आता."

बोक्या म्हणाला, ''अरे, आता मी खरं खरं वचन देतो. मी तुला त्रास देणार नाही. दुसरं काहीही खाईन पण तुझ्यासारख्या फुलपाखरांना त्रास देणार नाही. विश्वास ठेव."

पण हिरव्याने त्याच्याकडे दुर्लक्ष केले व तिथून उडून गेला. खरं तर बोक्या हिरव्यापेक्षा कितीतरी शक्तिमान होता पण शक्तीपेक्षा हिरव्याची चलाखी भारी पडली होती.

**संपर्क : ९८८१७३४६८४**

# कुतूहल

वसुंधरा भोपळे, ७३८७४३२९४१

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' फेब्रुवारी २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मार्च २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) भारतीय नौदलात नुकतीच समाविष्ट झालेली, शत्रूच्या रडारवर टिपता न येणारी युद्धनौका आय एन एस तुशील खालीलपैकी कोणत्या देशात निर्माण करण्यात आली आहे?**

१. जपान २. रशिया ३. ऑस्ट्रेलिया ४. सेनेगल

**२. थोर समाजसेविका आणि स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले या एक कवयित्री म्हणूनही प्रसिद्ध आहेत. सावित्रीबाईंनी खालीलपैकी कोणती काव्यरचना रचली?**

१. बावन्नकशी सुबोध रत्नाकर २. सत्यार्थ प्रकाश
३. भावार्थदीपिका ४. सार्वजनिक सत्यधर्म

**३. भारताचे तत्कालीन अर्थमंत्री ------ यांनी १९९१ साली खाउजा अर्थात खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण धोरणाचा प्रारंभ करून आधुनिकीकरणाचा पाया रचला.**

१. यशवंत सिन्हा २. डॉ. मनमोहन सिंग
३. जसवंत सिंग ४. पी. चिदंबरम

**४. १३ ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान झालेल्या २३ व्या पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची २०२५ सालची संकल्पना खालीलपैकी कोणत्या अभिनेत्याच्या जन्मशताब्दीचा गौरव करते ?**

१. देव आनंद २. शमी कपूर
३. राज कपूर ४. विनोद खन्ना

**५. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसाळेच्या प्रशिक्षक --- यांना द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**

१. स्वाती देशपांडे २. दिपाली देशपांडे
३. अभिनव बिंद्रा ४. वनिता बुधले

**६. मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार विजेत्या खेळाडूंची त्यांच्या संबंधित खेळाशी लावलेली खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे ?**

१. डी. गुकेश – बुद्धिबळ २. हरमनप्रीत सिंग – हॉकी
३. प्रविणकुमार – पॅरा ॲथलीट ४. मनू भाकर – जलतरण

**७. भारतीय अंतराळ संशोधन संस्था 'इस्रो' चे नवनियुक्त अध्यक्ष कोण आहेत ?**

१. एस. सोमनाथ २. डॉ. व्ही. नारायणन
३. डॉ. मधुकर राव ४. चिदंबरम पिल्लई

**८. बाल हक्क संरक्षण आयोग (CPCR) कायदा, २००५ द्वारे राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना ५ मार्च २००७ रोजी करण्यात आली आहे. या आयोगाच्या लोगोमध्ये खालीलपैकी कोणते विधान आहे ?**

१. भविष्यो रक्षति रक्षित:
२. तमसो मा ज्योतिर्गमय
३. ज्ञानम् परमम् ध्येयम्
४. धियो यो नः प्रचोदयात्

**९. आंतरराष्ट्रीय महिला दिवस : ८ मार्च : आंतरराष्ट्रीय फुलपाखरू दिवस : ?**

१. १२ मार्च. २. १० मार्च.
३. १४ मार्च. ४. २३ मार्च.

**१०. दरवर्षी २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिवस साजरा करण्यात येतो. २४ मार्च १८८२ रोजी खालीपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने क्षयरोगाच्या जीवाणूचा शोध लावला ?**

१. लुई पाश्चर
२. रॉबर्ट कोच
३. अलेक्झांडर फ्लेमिंग
४. एडवर्ड जेन्नर

**११. जागतिक चिमणी दिन : २० मार्च : जागतिक हवामान दिन : ?**

१. २१ मार्च. २. २२ मार्च.
३. २३ मार्च. ४. २४ मार्च

**१२. नागपूर आणि भंडारा जिल्ह्यांच्या सीमेवर खालीलपैकी कोणती नदी वाहते ? या नदीवर उमरेड जवळ गोसे खुर्द नावाचे धरण आहे.**

१. गोदावरी २. तापी ३. इंद्रायणी ४. वैनगंगा

**१३. २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ----- जिल्ह्यातील महाड येथे चवदार तळे सत्याग्रह केल्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ २० मार्च हा दिवस सामाजिक सबलीकरण दिवस म्हणून भारतभर साजरा केला जातो.**

१. नाशिक २. रत्नागिरी ३. रायगड ४. सिंधुदुर्ग

**१४. वसंतोत्सवाचा प्रारंभ वसंत पंचमीला होतो तर त्याची सांगता केव्हा होते ?**

१. सौभाग्य पंचमी २. रंगपंचमी

३. ऋषी पंचमी ४. नागपंचमी

**१५. स्वराज्याच्या कुलमुखत्यार महाराणी येसूबाई यांचे ----- जिल्ह्यातील संगम माहुली येथे असलेले समाधी स्थळ राज्य शासनाने राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर केले आहे ?**

१. पुणे

२. कोल्हापूर

३. सातारा

४. सोलापूर



## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

## फेब्रुवारी चित्रकोडे उत्तर




## कुतूहल (फेब्रुवारी २०२५) ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १-१ | ५-३ | ९-३ | १३-१ |
| २-२ | ६-३ | १०-१ | १४-४ |
| ३-१ | ७-२ | ११-३ | १५-१ |
| ४-३ | ८-१ | १२-४ | |

## किशोर जानेवारी २०२५ कुतूहल यशस्वी स्पर्धक

**सांगली** - कु. ऋतुजा यादव, **सोलापूर** - कु. शनय भोसले, **पुणे** - कु. समृद्धी महाडीक, कु. शिवानी शिवेकर, कु. अक्षदा शिवेकर **वर्धा** - कु. जान्हवी प्रजापती, कु. श्रावणी सरदार **अहिल्यानगर** - कु. वेदिका गमे **कोल्हापूर** - कु. समर्थ पाटील, कु. जोया सय्यद **सातारा** - कु. सुवीर फडे

## किशोर जानेवारी २०२५ चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

**वर्धा** - कु. अनुष्का देशमुख, कु. भक्ती कनेर, कु. जान्हवी प्रजापती, कु. मिसबत शेख शकील, कु. लावण्य ढोक, कु. श्रावणी सरदार, कु. श्रुतिका सरदार, कु. श्रेया वैराळे, कु. सर्वज्ञ ढोंबरे, कु. स्नेहल सरदार, कु. स्वस्तिका चरडे
**सांगली** - कु. ऋतुजा यादव, कु. शांभवी कुलकर्णी, कु. दिशा जाधव,
**पुणे** - कु. तनय भोसले, कु. निषाद भोसले, कु. समृद्धी महाडीक, कु. शिवानी शिवेकर, कु. अक्षदा शिवेकर, कु. तन्वी भालेराव, कु. भुषण भरणकर, कु. धनश्री भरणकर
**कर्नाटक (हुबळी)** - कु. अमृत आपटे
**सातारा** - कु. आरोही डोईफोडे, कु. परी पवार, कु. शौर्य सरगडे, कु. सुवीर फडे, कु. श्रेयश राऊत, कु. हर्षल राऊत
**मुंबई** - कु. अयन भिडे, **ठाणे** - कु. अनन्या भेरे
**बीड** - कु. श्रावणी दुधाळ, कु. अश्विनी शेळके, कु. शिवन्या गायकवाड, कु. अलिया शेख, कु. निकिता दुधाळ, कु. भक्ती शिंदे, कु. समीक्षा देवकर, कु. आदर्श शिंदे, कु. संस्कार दुधाळे, कु. प्रिन्स बडे, कु. श्रेयश देवकर, कु. संचिता सालपे, कु. सिद्धांत दुधाळ
**सिंधुदुर्ग** - कु. दुर्वा चव्हाण, कु. गौरी गोरूले, कु. कैलास सावंत, कु. प्रज्ञा आयरे, कु. जिनत शेख, कु. गौरी दसुरे, कु. अथर्व पवार, कु. आरोही राऊत, कु. संजय तावडे, कु. क्रिश शिंदे, कु. विनय वाडेकर, कु. दिव्या गोरुले, कु. समृद्धी गोरुले, कु. हर्षाली धाडी, कु. राज वाडेकर, कु. योगिनी परब, कु. पूर्वा घाडी, कु. तन्मय जाधव, कु. धनश्री तारी, कु. खुशी धुरी, कु. वासंती धुरी, कु. मानवी नाईक, कु. भूमेंद्र सावंत, कु. अवनीज्ञ जोशी,
**नाशिक** - कु. कारुण्य शिऊरकर, कु. प्रणव धोंडगे, कु. दर्शन भांबर
अकोला - कु. महेश ठोसर
**नागपूर** - कु. नीरजा कुलकर्णी, **कोल्हापूर** - कु. अमृत हांडे
**अहिल्यानगर** - कु. वेदिका गमे, कु. जोया सय्यद, कु. स्वरा वाणी, पार्थ वाणी, कु. आरोही धस, कु. श्रावणी धस, कु. गौरी धस, कु. प्रज्ज्वल आमले, कु. श्लोक आमले, कु. पार्थ वाणी, कु. स्वरा वाणी, कु. प्रिशा धस, कु. आराध्या धस
**बुलडाणा** - कु. धीरज तायडे, कु. शिवानी इंगळे, कु. अमृता डुकरे, कु. खुशी राघणे, कु. श्रुती बोचरे, कु. सोहम जोहरी
**नांदेड** - कु. जैद शेख, कु. जिक्रा शेख, कु. अ.गफार फाजलाणी
**वर्धा** - कु. आदर्श चरडे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



एके दिवशी मी सकाळी उठून अंघोळ केली व कपडे घातले. मग मी माझे केस विंचरले आणि मग शाळेला जाण्यासाठी दप्तर भरू लागले व डबा भरला, पाण्याची बाटलीही भरली. आणि तेवढ्यात मी घड्याळात पाहिले, तर काय साडेनऊ वाजले होते. मग मी शाळेत निघाले.

रस्त्याने जाताना मला एक आजोबा दिसले. त्यांना रस्ता क्रॉस करायचा होता. पण त्यांना नीट चालता येत नव्हते. मग मी त्यांची अशी अवस्था पाहून त्यांच्या जवळ गेले. व त्यांना म्हणाले, ''आजोबा मी तुम्हांला रस्ता क्रॉस करून देऊ का''? तेव्हा ते आजोबा म्हणाले, 'हो दे मला रस्ता क्रॉस करून.'' मगा मी त्यांना रस्ता क्रॉस करून दिला, तेव्हा ते आजोबा मला म्हणाले, 'खूप धन्यवाद.' असे ऐकून मला खूप बरे वाटले. कारण मी पहिल्यांदा चांगले काम केले होते. मग मी शाळेत गेले आणि माझ्या मित्रमैत्रिणी ही गोष्ट सांगितली व शिक्षकांनाही सांगितली. तेव्हा सर्वांनी माझे कौतुक केले. मग मी घरी गेले आणि माझ्या आईवडलांना ही गोष्ट सांगितली. तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून मलापण खूप आनंद झाला.

**कु. स्वरा प्रवीण देशमुख,** जि. प. प्राथमिक केंद्रशाळा, कोतूळ
ता. अकोले, जि. अहिल्यानगर– ४२२६१०



एके दिवशी मी, माझी मैत्रीण व तिचे भाऊ आईबाबांना सांगून रानात फिरायला गेलो होतो. रानात एका कुत्र्याने चिमणीला पकडले होते. त्याच्या पंजाच्या खाली त्याने चिमणीला धरून ठेवले होते. मी पहिल्यांदा तेथून त्या कुत्र्याला हाकलले. चिमणीच्या अंगावर त्याने नखे मारली होती. म्हणून तिच्या अंगाला मोठी जखम झाली होती. त्या जखमेमुळे चिमणीला नीट चालताही येत नव्हते. रानांत फिरायला जाताना आम्ही खाऊ व पाणी नेले होते. मी ते पाणी घेतले व त्या चिमणीला पाणी पाजले. त्यानंतर घरी गेल्यावर चिमणीच्या जखम झालेल्या अंगावर हळदपूड लावली व चार-पाच दिवस चिमणीला घरातच ठेवले व तिला पोटभर खायला-प्यायला दिले. पाच दिवसांनी चिमणी एकदम ठीक झाली होती व त्यानंतर तिला सोडून दिले. जखमी व मुक्या प्राण्याची मदत केल्यामुळे घरातील सर्वांनी माझे कौतुक केले.

**कु.प्रियांका सर्जेराव पाटील,** मु. पो. एरंडपे, ता. भुदरगड,
जि. कोल्हापूर– ४१६२०९.



आमच्या गावात आठवडी बाजार भरत नाही. आम्हांला बाजारासाठी सात किलोमीटर दूर जावे लागते. मी एकदा बाजारात जात असताना, एका आजीने मला आवाज दिला. आजी म्हणाली, ''मलासुद्धा भाजीपाला आणि काही सामान आणून देशील का?'' मी हो म्हणालो, आजीला बरे वाटले. मी आणि माझी बहीण आम्ही बाजारातून जाऊन आजीचे आणि आमचे सामानसुद्धा आणले. आजी आमची वाटच पहात होती. आजीला बाजार आणून दिल्यामुळे तिला खूप आनंद झाला. आजीने आम्हांला तिच्याजवळची बोरं दिली. आम्ही आनंदाने घरी पोहोचलो आजीला मदत करून मला खूप आनंद झाला. मीही गोष्ट आईला सांगितली तिने माझे खूप खूप कौतुक केले.

**कु. संग्राम राम शिंदे,**
जि.प.प्राथमिक शाळा, केळसांगवी,
ता. आष्टी जि. बीड- ४१४२०३.



मी व माझे बाबा एकदा गाडीवरून जात असताना एक पक्षी तारेवर बसला होता. त्याला अचानक करंट बसला व तो खाली पडला. मी पळतच जाऊन त्याला उचलले. खूप जोराने पाऊस पडत होता. तो पक्षी थंडीने खूप कापत होता. माझ्याकडे एक रुमाल होता. मग मी त्या रुमालाने त्याचे अंग पुसले. त्याच्या पायाला जखम झाली होती. मग मी त्याला माझ्या पेनच्या टोपणातून पाणी पाजले. तो पक्षी उडायचा प्रयत्न करत होता. पण म्हणतात ना 'प्रयत्नांती परमेश्वर' तसेच झाले, तो उडू लागला व उडत उडत तो एका झाडावर बसला आणि आपल्या घरट्याकडे पाहू लागला. तेव्हा मला समजले की तो पक्षी घरट्यासाठी काही तरी शोधत होता. मग मी व माझे बाबा शाळेला निघालो.

**कु. अर्णव तुकाराम शिंदे**
जि.प.आदर्श केंद्रशाळा, साखरपा नं.१,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी- ४१५८०१



एके दिवशी आमच्याच शाळेतील एक मुलगी रडत होती. ती माझ्या वर्गात नव्हती. माझ्याहून लहान होती. ती का रडत होती ते मला माहीत नव्हते. आमच्या वर्गात एका मुलीचा वाढदिवस होता तर तिने चॉकलेट वाटले होते. ते मी खाल्ले नव्हते. मी माझे चॉकलेट तिला दिले. तिने रडणे थांबवले. तिच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मलाही खूप आनंद झाला.

**कु. शर्वरी पवन चांडक**
बाल विद्यामंदीर, वैभव नगर,
परभणी- ४३१४०१.



रविवारी सुट्टीच्या दिवशी आम्ही दुपारी खेळत असताना तुळजापूर बस आली. त्या बसमधून आमच्या घराशेजारील आजी हातात पिशवी घेऊन उतरल्या. त्यांना ती पिशवी घेऊन चालता येत नव्हते तेव्हा मी लगेच धावत जाऊन आजीच्या हातातून पिशवी घेतली व आजीला घरापर्यंत सोडले. आजीने आम्हां मुलींना खाऊ दिला आणि म्हणाली, 'शिका मोठे व्हा व अशीच दुसऱ्यांना मदत करत रहा.'

**कु. वैभवी उत्तम पांचाळ,** इ.३री (अ),
जि. प.प्राथमिक शाळा, काटगाव,
ता. तुळजापूर, जि. धाराशिव- ४१३६०३

## उमलती प्रतिभा



# मी स्त्री बोलते

मनातून एक आवाज येतोय
काही तरी सांगू पाहतोय
खूप झालं ते रडायचं
आता फक्त लढायचं
कोणी जर स्वाभिमानाला
हात लावला तर त्याला खडसवायचं
आपल्या स्वप्नांवर आपण पांघरूण का घालायचं?
सांगतील तसं आपण का वागायचं?
सतत स्वतःला का कोसायचं?
आपणच का सांभाळून रहायचं?
मग यांनी कधी सुधारायचं?
स्वतःला मर्द म्हणून घ्यायचं
आणि असुरासारखं वागायचं?
अशा असुरांमुळे
चांगली माणसं ओळखायला का चुकायचं?
बस आता बस! दुर्गेचे रूप घ्यायचं
जिथे चुकेल तिथे खडसवायचं.
इतरांना असे, प्रश्न पडतच नाही.
की आपणच का सहायचं?
चुकी नसताना का घाबरायचं?
बोलू द्या यांना
आपण फक्त आपल्या स्वप्नांच्या मागे धावायचं...

कु. ऋषी मंगेश निकुंभ
इयत्ता-८ वी, रचना विद्यालय,
नाशिक- ४४२२०२



# चिव चिव चिमणी

चिव चिव चिमणी इकडे ये गं, इकडे ये
माझ्याच झाडावर बस गं बस, बस गं बस
चिव चिव चिमणी...
माझ्या झाडावर लागलीत सफरचंद
सफरचंदाची फोड लागते गोड
चिव चिव चिमणी, काव काव कावळ्या, इकडे या इकडे या
माझ्याच झाडावर बसा रे बसा, बसा रे बसा
माझ्या झाडावर लागलेत आंबे
आंब्याची फोड लागते गोड
चिव चिव चिमणी, काव काव कावळ्या, मिठू मिठू पोपट
इकडे या, इकडे या
माझ्याच झाडावर बसा रे बसा, बसा रे बसा
माझ्या झाडावर लागलेत पेरू
पेरूची फोड लागते गोड
चिव चिव चिमणी, काव काव कावळ्या, मिठू मिठू पोपट
कुहू कुहू कोकीळ इकडे या, इकडे या
माझ्याच झाडावर बसा रे बसा, बसा रे बसा
माझ्या झाडावर लागलीत डाळिंब
खा तुम्ही डाळिंब दाणे, गा मग गोड गाणे
चिव चिव चिमणी, काव काव कावळ्या मिठू मिठू पोपट,
कुहू कुहू कोकीळ, हूप हूप माकड इकडे या, इकडे या
माझ्याच झाडावर बसा रे बसा, बसा रे बसा
माझ्या झाडावर लागलीत केळी
केळी सोला, फ्रुट सॅलड करा
फ्रुट सॅलड करा फस्त मजा करा मस्त...

जुई विराज महाजन, इ. – ३ री
जीवन शिक्षण शाळा, गुहागर नं. १,
ता. गुहागर जि. रत्नागिरी

# रोहितची कमाल

पाचवीतल्या रोहितची वार्षिक परीक्षा संपल्यावर उन्हाळी सुट्टीत रोहीत आपल्या लहान भावासोबत गावी गेला. त्याचा आवडता खेळ म्हणजे क्रिकेट. तो रोज गल्लीमध्ये न चुकता संध्याकाळी खेळायचा. असेच एके दिवशी रोहित, त्याचा लहान भाऊ सागर आणि त्याचे काही मित्र मिळून क्रिकेट खेळत होते. त्याच वेळी त्याला एका मांजराचा आवाज आला. ''जरा थांबा. सगळ्यांनी तो मांजराचा आवाज ऐकला का?'' रोहित म्हणाला, सगळे एक साथ बोलले ''हो, रोहित.'' दिनेश म्हणाला, ''या मांजराचा आवाज थोडा विचित्रच वाटतो आहे ना.'' ''हो, ना! दिनेश दादा'' सागर म्हणतो. रोहीत म्हणतो, ''ते मांजर अडचणीमध्ये आहे असं त्याच्या आवाजावरून वाटत आहे.'' ''हो, त्याला आपण लवकरात लवकर शोधले पाहिजे.'' रोहित, सागर, रमेश, दिनेश, देवांश सर्व मिळून त्या मांजराला शोधण्यासाठी इकडेतिकडे पळू लागले. थोड्या वेळानंतर रोहितला ते मांजर सापडते. तो सर्वांना बोलावून म्हणाला, ''हे पहा! हे मांजर गटारीमध्ये पडले आहे. मी गटारीमध्ये उतरतो.'' मांजराला वर काढल्यावर रोहितला दिसले की, त्याच्या पायाला थोडी जखम झाली आहे. तो पळत मांजराला घेऊन घरी गेला. त्याने मांजराला स्वच्छ अंघोळ घातली आणि त्याच्या पायाला मलमपट्टी केली. ते मांजर रोहितजवळच राहणे पसंत करू लागले. रोहितलापण ते मांजर खूप आवडले. म्हणून त्याला तो घरी पाळतो.

रोहितने त्या मांजराची बरे होईपर्यंत चांगली देखभाल केली. ते मांजर थोड्याच दिवसांत पूर्णपणे बरे झाले.

**कु. अथर्व निलेश कसबेकर** प्लॉट नं. ६, श्रीधर अपार्टमेंट, मोहिते पार्क, राधानगरी रोड, कोल्हापूर– ४१६०१२.



**कोमल करवर**
इयत्ता ८ वी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राघूचीवाडी
ता. जि. धाराशिव– ४१३५०१



**विराट नितीन परदेशी**
इयत्ता ३ री, जिल्हा परिषद प्राथ.शाळा हट्टी
ता. चांदवड जि. नाशिक ४२३११७



**कु.स्वरा हेमंत कामथे**
इ. ३ री, जि. प. प्राथ. शाळा खळद,
ता. पुरंदर, जि.पुणे– ४१२३०१.


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
राजेश, विनय आणि नेहा
विनय, मला भीतीच वाटायला लागली रे...
त्यात काय घाबरण्यासारखं, आपल्या सरांनी त्यांना फोन केला आहे.
अरे राजू, आपल्याला शाळेचं पत्र फक्त त्यांना द्यायचं आहे.
अगं, ते एवढे मोठ्ठे जादूगार! त्यांच्याशी बोलायचं म्हणजे...
दोघांनी अगदी गप्प बसायचं... फक्त मीच बोलेन त्यांच्याशी
ते येतील ना रे आपल्या शाळेच्या वार्षिक संमेलनाला पाहुणे म्हणून !
येतील अन् जादूही दाखवतील. तुम्ही फक्त गप्प रहायचं तिथं
ती जादू दाखवायला हवी.. पुढे असलेली वस्तू आपल्या डोळ्यांदेखत..
गायब होते... आपल्याला संमोहीत करतात ते.


थोड्या वेळात
त्यांच्या बंगला आलाय. ते दरवाजा उघडतील त्यांना नमस्कार करा.
विनय बराच वेळ बेल वाजवत होता, पण दरवाजा उघडत नव्हता
आतून तर आवाज येत आहे. मग....?
ते बाहेर आले की मी त्यांच्यासोबत फोटो काढणार... मोबाईल आहे माझ्याकडे
अगं, आधी भेट तर होऊ दे आणि त्यांच्या परवानगीशिवाय त्यांचा फोटो काढू नकोस
बरं बाबा.
तितक्यात दरवाजा उघडला
काय काम आहे? कोण हवंय आपल्याला?
ते, ते, जादूगार सरांना भेटायचं होतं. आहेत ना ते घरात?
ते आता भेटू शकणार नाही... उद्या या. जा आता
आम्ही नवोदय शाळेतून आलोय. त्यांना शाळेचं पत्र द्यायला... तसा मुख्याध्यापक सरांनी फोन केला होता त्यांना...
क्रमशः

# स्मार्ट घर चिऊचं

■ लक्ष्मीकांत माने

एक होती चिऊ, पिसं तिची मऊमऊ
झोपत होती फांदीवर
डोळ्यांत घेऊन स्वप्नं सुंदर
स्वप्नं होतं स्मार्ट घराचं

नवीनच झाली उंच इमारत
करीत होती झाडाशी शर्यत
त्यात होती बच्चे मंडळी
खेळत होती करून कोंडाळी

नव्या गॅलरीतून चिंटू पाही
फांदीवरून चिऊ पाही
रोजचा होता डोळ्यांनी संवाद
नव्हता त्यात कुठला वाद

छान छान चिंटूच्या घरी
कड्या, कुलूप अन् नवी गॅलरी,
चिऊला वाटलं आपण पण
बांधाव घरटं छान छान भारी

चिंटूचं सगळं काही हायफाय
श्वास त्याचा वायफाय
इंटरनेटने चाले सारे
विना त्याच्या पान न हाले

चिंटू म्हणे तुझंचं घरटं छान छान
स्वच्छ प्रकाशित सूर्याची जाण
वारा वाहतो झुळझुळू,
आनंद वाढतो हळूहळू

कसली लिफ्ट नि, स्विमींग पूल
बरी पारंबी न् दवांत भिजलेलं रानफूल
वाऱ्याची ना झुळूक तिथे
एसी, पंखा गरमच भिरभिरे

मग चिऊ झाली आनंदी
नाचू लागली फांदोफांदी
चिऊने केला जल्लोष
हर्षाने तिला आला जोश

संपर्क : ८६००९९४१०५



इंग्रजी विभाग

# Song of Joy

■ Meena Khond

*Flowers and flowers*
*A lot of fragrance*
*Windy resohance*
*Sing a song of joy*

*Lots of leaves*
*Trees Swinging.*
*dancing dancing*
*Sing a song of joy*

*Birds are lovely*
*Wings are beautiful*
*Voices so graceful*
*Sing a song of joy...*

*Meandering river*
*Windy songs ever*
*Rhythm of water*
*Sing a song of joy...*

**Contact : 7799564212**



Vivek Bhalerao



# Bandu Learns to fly

Bandu was a bright student who loved science and technology. He was a student of Pethe Vidyalaya at Nashik. He had won the school's science quiz competition and was awarded a unique prize - a chance to learn flying from a certified instructor.

Bandu was thrilled. "Wow, I will get to fly a plane!"

His instructor, Captain Kumar, smiled. "Not just any plane, Bandu. You'll learn to fly the Hindustan Aeronautics Limited (HAL) Tejas, an Indian made fighter jet."

Bandu's eyes widened. "That's amazing!"

Captain Kumar began, "First, we need to cover the basics. Aviation vocabulary, aircraft parts, and flying techniques."

Bandu nodded eagerly as Captain Kumar explained terms like "aerodynamics," "thrust," "drag," and "lift."

Next, they moved

on to aircraft parts - "cockpit," "fuselage," "wings," and "control surfaces."

Bandu asked, "How do pilots control the plane?"

Captain Kumar replied, "Using the control yoke or stick, they manipulate the ailerons, elevators, and rudder to roll, pitch, and yaw the aircraft."

Bandu's eyes sparkled. "I get it! Like a video game, but real!"

Captain Kumar chuckled. "Exactly, Bandu. Now, let's practice in a simulator."

As they "flew" the simulator, Bandu learned about take-off, landing, and navigation.

Finally, the day arrived for Bandu's first real flight in the Tejas.

Bandu's instructor, Captain Kumar, began the pre-flight briefing. "Okay, Bandu, today we'll cover take-off, climbing, cruising, descending, and landing. We'll also practice communication with air traffic control."

Bandu nodded; eager to learn.

As they taxied down the runway, Captain Kumar explained, "Take-off speed is 150 knots. Once we reach that speed, we'll rotate and lift off."

"Roger that," Bandu replied, repeating the phrase he'd learned to say that the message is understood.

As they took off, Bandu felt the rush of adrenaline. "Whoa, we're flying!"

Captain Kumar smiled. "Now, let's climb to 10,000 feet. Remember, gentle movements on the controls."

Bandu nodded, adjusting the yoke.

Once they reached cruising altitude, Captain Kumar pointed out a storm cloud. "See that, Bandu? We need to avoid that. Lightening can be dangerous."

Bandu nodded, watching as Captain Kumar navigated around the storm.

As they began their descent, Captain Kumar contacted air traffic control. "This is Foxtrot-Bravo-Uniform-November. (code words) Descending to 5,000 feet. Over."

The control tower responded, "Foxtrot-Bravo-Uniform-November, cleared for landing on runway 27. Report down safe."

Bandu repeated the same phrase, practicing his communication skills.

As they landed smoothly on the runway, Bandu grinned. "That was amazing!"


Captain Kumar patted him on the back. "You're a natural, Bandu. Remember, flying is about teamwork, focus, and safety."


**Contact : 9763286990**

# Funny Puzzle


Ghanshyam Deshmukh

**Count how many fish are jumbled in this picture.**
**Write the correct number in the box given at bottom.**






**Find the correct place for each square of picture.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मार्च २०२५.

३) कोड्याचे उत्तर एप्रिल २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.02.2025 Date of Posting 27th & 28th February 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




ऑनलाईन वर्गणीकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,